१. अन्वाधेयक स्त्री धन, आणि भर्तृप्रीतिदत्त (नवऱ्यानें प्रीतीनें दिलेलें) स्त्रीधन या खेरीज राहिलेले स्त्री धनाचे प्रकार मागें किंवा पुढें सांगितलें असून त्याच्या विभागा विषयीं मुद्दाम ठराव केला असेल ते प्रकार खेरीज करून, बाकीचें जें स्त्रीधन राहिलें तें पारिभाषिक स्त्रीधन असें म्हणावें. त्याचा विभाग कसा व्हावा याज बद्दल व्याख्या.

२. पारिभाषिक स्त्री धन असोन ज्या स्त्रीस तें स्त्रीधन मिळालें ती धन

होऊन नवरा, पुत्र, दीर, इत्यादिक तिचे वारस असून कन्या ही आहे तर त्या धनाची मालकी त्या कन्येचीच आहे; इतर वारिसदार यांची नाहीं असें समजावें.

३. वरील रकम २ प्रमाणें, मृतस्त्रीच्या अनेक कन्या असतां त्यांन कांहीं विवाह झालेल्या असोन, त्या पैकीं, कांहीं सधन व कांहीं निर्धन व कांहीं अविवाहित असतील, तर त्याचा विभाग कसा व्हावा याचा खुलासा वरील रकमे वरून होत नाहीं; एतदर्थ खालच्या रकमेंत स्पष्टी करण करितों:—

४. एका मुलीचें लग्न झालेलें असोन ती सधन आहे, व दुसरी लग्न झालेली असून निर्धन आहे, व तिसरी अविवाहित अशा अनेक असतील तर त्या पैकीं जिचें लग्न झालें नसेल, तीस तें स्त्रीधन द्यावें; जर तिघीही लग्न झालेल्या असोन निर्धन असतील तर त्या सर्वांनीं समान वाटून घ्यावें; [illegible] एक सधन अशा असतील तर ज्या [illegible] निर्धन असतील त्यांस [illegible] घीही सधन असतील तर त्यांस [illegible] ही समान वांटून घावें.

श्लोक. मनुः

स्त्रियास्तु यद्भवेद्वित्तंपित्रादत्तंकथंचन ॥
ब्राह्मणी तद्धरेत्कन्यातदपत्यस्यवाभवेत् ॥
[illegible] कन्यातुसपत्नीमातुरपिधनंगृण्हाति ३५

एका पुरुषास दोघी बायका [illegible] का असोन त्या दोघींसही वरील कलमांतील स्त्रीधन झालें असतां त्या उभयतां स्त्रि[illegible] यां पैकीं एकीस कन्या आहेत तर सापत्न [illegible] उभयतांचें स्त्रीधन असेल तें [illegible] असतील तर परस्परांनीं [illegible] त्या कन्यानीं वांटून घ्यावें. आतां उभयतां स्त्रियांस ही कन्या नसतील त्या वारसांनीं यथ[illegible] मान वांटून घ्यावें. जर उभयतां स्त्रियांस कन्या मुळींच नसतील [illegible] ब्राम्हण स्त्रियांस बापानें दिल्यास [illegible] भागाचे अनुक्रमानें विभाग करून घ्यावे. सदरहू कलमांतील [illegible] विशेष [illegible] धनास मात्र लागू आहे.

[illegible] कन्या

श्लोक. नारदः

[illegible] दुहितरोभावेदुहितृणांतदन्वयइति ३६

वरील कलमा आहे [illegible] नें घ्यावें असें लिहिल्या प्रमाणें त्या स्त्रीस जें स्त्रीधन मिळालें असेल तें स्त्रीधन तिचे कन्या किंवा कन्या असती [illegible] ल्यें आहे; परंतु त्या कन्या मृत असतील तर त्या कन्येचे जे वंशज [illegible] [illegible] त्यांणीं आपले आईचें स्त्रीधन समान वांटून घ्यावें.

[illegible]

उदाहरण.

मृत होतील, आणी ख च्या वंशांत ग मुलगा व घ मुलगी अशीं दोन अपत्यें असतील आ. दे क इनें स्त्रीधन वर लिहिले प्रकारचें असेल त्या प्रसंगीं ग आणि घ या उभयतांनीं समान विभागून घ्यावें. विभाग करणें तो दायविभागांतील अनुक्रमानें करावा.

मयूखपंक्ति.

भिन्नमातृकाणांदुहितॄणांदौहित्राणांचाऽने कपितृकाणांपितृतोभागकल्पनेति ॥ ३७ ॥

एका पुरुषास दोघी बायका असून त्या दोघींचेंही स्त्रीधन असेल तेंव्हां तें सम असो, किंवा विषम असो तथापि त्या प्रत्येक बायकोस सम किंवा विषम मुलें असतील तरी त्यांचा विभाग होणें तो उभयतां स्त्रियांचें धन एकत्र करून स्त्रियांचे अनुक्रमानें सम विभाग करावा; पुढें दर एक स्त्रीचे मुलांचा विभाग होणें तो त्या प्रत्येक स्त्रियांच्या पोटच्यांनून दायविभागाच्या अनुक्रमानें व्हावा.

एका बायकोस दोघी मुली असून त्या स्त्रीचें स्त्रीधन असेल आणि त्या दोघीं मुलींपैकीं एकीस जास्त व एकीस कमी, किंवा दोघीस समान मुलें असतील, किंवा एकीस मुलें असून एकीस मुळींच मुलें नसतील तथापि त्या दोघी मुलींचे दोन विभाग व्हावेत मग त्यांतून त्या उभयतां मुलींचा अपत्यांनीं आप आपल्या आईचा विभागांतून धन समान वांटून घ्यावें. मूळ विभाग करण्यास अपत्य आहेत किंवा नाहींत हें पाहाण्याचें कारण नाहीं.

श्लोक. याज्ञ.

मातुर्दुहितरः शेषमृणात्ताभ्यऋतेऽन्वयः ३८

एकंदर स्त्रीधनांत कन्ये बद्दल बाधक वचन.

एका स्त्रीस एक मुलगा, व दोघी मुली असे वारस असतां ती स्त्री मयत झाली आणि तिचें स्त्रीधन असोन तिजला दुसऱ्याचें कर्ज देणें असेल तर मुलानें आईचें स्त्रीधन असेल तें घेऊन कर्जदाराचें कर्ज देणें असेल तें फेडावें; जर स्त्री धन ज्यास्त असोन कर्ज कमी असेल तर कर्ज फेडून बाकी जें अवशिष्ट राहील तें मुलीस वांटून द्यावें. कर्ज आणि स्त्रीधन समान असेल त्या प्रसंगीं तें धन मुलानें घेऊन कर्ज फेडावें. कर्जापेक्षां धन कमी असेल त्या प्रसंगीं कन्यांकडे कांहीं संबंध नाहीं. मुलानेंच तें धन घेऊन कर्जदारचें कर्ज फेडावें.

श्लोक. कात्या.

दुहितॄणामभावेतुरिक्थंपुत्रेषुतद्भवेदिति ३९

ज्या स्त्रीस स्त्रीधन मिळालें असेल तिजला कन्या व दुहित्र ह्मणजे कन्येचा वंश या

होऊं पैकीं, कोणीही नसतील तर तिचे मुलगे नातूकिंवाते, जे वारस असतील त्यांणीं अनु क्रमानें यथाविभागें स्त्रीधन वांटून घ्यावें.

मयूख पंक्ति.

विभजेरन्सुताःपित्रोरूर्ध्वंरिक्थंरुणंसम मितियाज्ञवल्क्योक्तंतत्पारिभाषिकातिरिक्त विभागकर्तनादिपरं॥तेनपारिभाषिकातिरि क्तमातृधनंदुहितृसत्त्वेपुत्राद्यएवलभेरन् ३९

शंका घेऊन निवारण करणें आहे, ती अशी कीं, आई व बाप मृत झाल्या नंतर त्यांचें कर्ज व धन जें असेल तें त्यांच्या परोक्ष पुत्रानींच सर्व वांटून घ्यावें म्हणोन दायविभाग प्रकर्णांत सांगितलें असोन स्त्री धनाच्या विभाग प्रकर्णीं कांहीं ठिकाणीं पुत्रास विभाग न मिळतां कन्येसच सर्व मिळावें म्हणोन सांगितलें आहे, त्यांवरून विरोध येतो, परंतु त्या प्रसंगीं शास्त्रानेंच आज्ञा दिली आहे तेव्हां विरोध म्हणणें निरर्थक आहे. पित्रा पुत्राचा विभाग होते समई स्त्रीसविभागदाय विभागाचे आधारें देण्या विषयीं सांगितलें आहे तें धन व स्त्रीनें शिल्प विद्या व कला कौशल्यें करून जें मिळविलें असेल तें धन अशा दोनी धनांचा आईच्या परोक्ष किंवा आई असेल तरीही कन्येस कांहींच अंश न मिळतां मुलानींच वांटून घ्यावें.

अतीतायामप्रजसिबांधवास्तदवाप्नुयुः

ज्या स्त्रीस मुलींच संतती झाली नसून तिचें स्त्रीधन असेल, आणि ती स्वर्गस्थ झाली असेल, त्या प्रसंगीं तिचा नवरा, दीर, सासू सासरा, व त्या प्रमाणेंच भाऊ इत्यादिक जे वारस असतील त्यांणीं तें स्त्रीधन दाय विभागा प्रमाणें यथा विभागें वांटून घ्यावें.

श्लोक. मनुः देवलः मयूखे.

आध्यग्न्यध्यावहनिकंदत्तंचप्रीतिकर्मणि॥भ्रातृ मातृपितृप्राप्तंषड्विधंस्त्रीधनंस्मृतं॥वृत्तिराभर णंइत्यादि॥ननिर्हारंस्त्रियःकुर्युरित्यादि॥ ४०॥

ब्राह्मण जातीच्या विधवा स्त्री अचळ तिच्या बापानें दिलेली, तसेंच त्या विधवेनें स्वतः संपादलेली मिळकत असोन, तिजला पहिल्या मयत दत्तकाची बायको, व दुसरा दत्तक असे दोघे वारस असतांही तिनें आपल्या मिळकतीचा नीति व्यवहाराकडे व्यय केला असतां कांहीं हरकत नाहीं; परंतु सदर वारसांची

उपजीविका चालली पाहिजे एतदर्थ संरक्षां दान, किंवा बक्षीस; अगर खरेदी देउं नये.

मयुख पंक्ती.

अथनस्त्रीस्थावरमर्हतीत्यादिवचनानिबंदिचारणादिदाननिषेधपराणिइत्यादि ॥

निपुत्रीक विभक्त झाल्या नंतरं मरण पावलेल्याची बायको, व पुतणें, व भाऊ इत्यादिक वारस असतां मयताची स्थावर जंगम मिळकत ही आहे तर त्या मयताच्या बायकोनें त्या मिळकतीचा उपभोग स्वतः करण्यास अगर दुसऱ्यास खरेदी किंवा बक्षीस देण्यास त्या विधवा स्त्रीस अधिकार आहे. या प्रसंगीं दीर व पुतणे इत्यादिकोणी अधिकारी होणार नाहींत.

मयुखपंक्ति.

कात्यायनः ॥ पितृमातृपतिभ्रातृइत्यादि ॥
अनेकवर्षेतुइतोधिकमपिशक्तौस्थावरमपिचदेयमित्युक्तंग्रंथेनयावज्जन्मनिर्वाहार्थस्थावरदानेभर्तुःअधिकारोस्ति ॥ तथाचजीवद्विभागेपत्न्यःसमांशकाःअनेनविभागप्राप्तस्त्रीधनमिदंआधिवेदनिकाद्यंचआदिपदेनरिक्थक्रयसंविभागोपितत्रैवोक्तत्वात्

... बायको, मुलगा, कन्या असे अनेक वारस असोन आपल्या विभागास आलेली स्थावर जंगम मिळकत पुत्र गैर चालीचा असल्या कारणानें ती जिनगी विभागून एक हिस्सा आपल्या बायकोस, व दुसरा हिसा आपल्या पुत्रास करून देऊन पुढें कांहीं दिवसांनीं बाप मयत झाल्या कारणानें आईच्या हिशास आलेली मिळकत आपल्यास मिळावी ह्मणोन पुत्र इच्छा करील तर त्यास ती मिळकत न मिळतां आईकडेसच राहावी. आई मेल्या नंतर तिच्या ज्या कन्या व पुत्र असतील त्यांजकडेसच जावी. कारण जी मिळकत ज्याणें स्वतः संपादली त्याचा व्यय करण्याचा अधिकार त्याचा त्यांजकडेस आहे. याजवरून बापानें जो विभाग केला तो शास्त्रास्त्र असोनलाआईच्या स्त्री धनावर ती जिवंत आहे तों परियंत लेंकाची मालकी नाहीं असें समजावें.

श्लोक. याज्ञव० मनुः विष्णुः

स्त्रीणामन्याइशकृणदानेनाधिकारः किंतुमतिप. प

मित्याद्युक्तमेवताभिर्देयं॥स्त्रीधनंतुपतिभ्रातृपितृभ्यामित्यादिमिताक्षरोक्तं द्रष्टव्यं॥नयोषित्पतिपुत्राभ्यामित्यादि॥

नवरा, सासू, सासरा इत्यादिकांनीं ज्या स्त्रीसजेदागिने दिले असतील त्याजवर नवरा सासू सासरा इत्यादिकांनीं केलेल्या कर्जा बद्दल सावकाराचा हुकूमनामा होऊन त्या स्त्रीस दिलेल्या दागिन्यां वर टाच लागून हुकूमनामा पुरा होणार नाहीं; परंतु नवरा सासूसासरा इत्यादिकांनी प्रपंच्या निमित्त कर्ज केलें असोन ती स्त्रीही स्वतः प्रपंच करीत असेल, व तिजला दुसरे कोणी वारस नसतील, व या दागिन्या खेरीज दुसरी कांहीं इस्टेट तिज जवळ नसेल त्या प्रसंगीं मात्र तिच्या दागिन्यांवर हुकूम नामा पुरा होईल.

मयूखपंक्ति. श्लोक. मनुः

जनन्यांसंस्थितायांतुसमंसर्वेसहोदराः॥भजेरन्मातृकंरिक्थंभगिन्यश्चसनाभयः॥दुहित्राद्यभावेपुत्रपौत्राद्याः धनंगृण्हीयुः॥

ग्रंथकार

क, इजला ख, ग, घ, असे तीन पुत्र आहेत; त्यांणीं स्थावर जंगम मिळकत वांटून घेतल्या नंतर त्याची मातोश्री क ही मयत झाली, तिजजवळ जें तीचें द्रव्य होतें. त्याचे विभाग करते समयीं ख याणें दोन हिसे घेऊन ग यास एक हिस्सा दिला, आणि घ हा मयत झाला, त्याचा अज्ञान पुत्र अ याचे मातोश्रीस एक हिस्सा दिला त्यास दाहा वर्षे झालीं असोन ज्यास एक हिस्सा मिळाला तो, व अज्ञान पुत्र मिळोन दोन हिस्से घेणारावर फिर्याद करितात तर त्याचा परिणाम काय होईल? अशी शंका घेऊन समाधान.—

आईची मिळकत असेल ती आई मेल्या नंतर तिची मुलगी व मुलीचा मुलगा इत्यादिक त्या मिळकतीस वारस होतील, ते नसल्यास ती मिळकत पुत्रानीं व पौत्र असल्यास त्यांनी समान वांटून घ्यावी. स्त्री धनाचा कमी किंवा जास्ती हिस्सा घेण्याचा त्यास अधिकार नाहीं.

समाप्त.

अथ
दत्तक प्रकरण प्रारंभः

जायमानोवैब्राह्मणस्त्रिभिर्ऋणवाजायतेब्रम्ह चर्येणऋषिभ्यः यज्ञनदेवेभ्यः प्रजयापितृभ्यः १

पुत्र व पौत्र झाल्या पासून काय उपयोग आहे याजबद्दल व्याख्या.

कोणताही मनुष्य उत्पन्न झाला असतां तो, (देव, ऋषि, पितर) या तिघांचा ऋणी होतो. त्यांत ब्रह्मचर्य श्रमांत जें व्रत करावें लागतें तें केल्यानें ऋषींचे ऋणा पासून मुक्त होतो.

ग्रहस्ताश्रमांत यज्ञयागादिक कर्मे केल्यानें देवाचे ऋणा पासून मुक्त होतो. व पुत्रसंतती झाल्यानें सोम, यमादिक पितरांच्या ऋणा पासून मुक्त होतो.

पुत्रेणलोकान्जयतिपौत्रेणानंत्यमश्नुते २

ज्यास पुत्र झाला तो कांहीं लोका मत म्हणजे इहलोक या मत जिंकून परलोकप्रत जातो; व पौत्र झाल्यानें स्वर्ग ब्रह्मादि लोका मत जाऊन अनेक सुखांमत उपभोग करितो.

ज्यास पुत्रसंतती असेल ते लोक तिनीही ऋणां पासून मुक्त होऊन स्वर्गलोका मत जातात, असें वरील कलमांत सांगितलें आहे; याजकरितां सर्वत्रांस पुत्रसंतान असतें असा कांहीं नियम नाहीं. (नापुत्रस्यलोकोस्तीत्याद्यलोकनात्स्वधातक्रियालोपात्पतंतीपिण्डइतिमनुवचनात् द्वत्तपुत्रो ग्राह्यः) अपुत्रक असतील तर ते पितर अधोगती मत जातात; याजकरितां अवरस पुत्राच्या अभावीं पुत्र प्रतिनिधि (दत्तपुत्र) विधियुक्त घेतला असतां ते पितर शुभ्री मत प्राप्त होतात, असें शास्त्रांत सांगितलें आहे, एतदर्थ दत्तक पुत्र अवश्य घेतला पाहिजे.

दत्तपुत्र असें कोणास ह्मणावें.

मातापितावादद्यातांयमद्भिःपुत्रमापदि॥ सदृशंप्रीतिसंयुक्तंसज्ञेयोदत्त्रिमःसुतः॥ ३॥

आपत्काल म्हणजे ज्या स्त्री पुरुषांस मुळीं संतती नसेल, अगर संतती होऊन नष्ट झाली असेल, अथवा संतती असोन ती निरुपयोगी ह्मणजे वादलेला, किंवा सरकारी गुन्ह्यांत आल्यानें हद्दपार झाला, किंवा घरस्पोर झाला असेल किंवा

क्षयादिक महारोगग्रस्त झाल्यानें पुढें त्याचें लग्न वगैरे होऊन संतती होण्याचा संभव नसेल अशा अनेक रीतीच्या अडचणी ज्यास असतील तशा स्त्री पुरुषास आई किंवा बाप अगर उभयतां प्रीतीनें आपला सजातीय पुत्र उदक घेऊन पूर्वक ज्यास देतात तो दत्तपुत्र असा समजावा.

आपत्काला शिवाय दत्तक देऊं नये. असें वरील वचनांवरून होतें, तेव्हां हा निषेध केवळ देणारासच लागू होतो, घेणारास होत नाहीं, असें ग्रंथकार पाणीसांगितलें आहे; परंतु पुढील वचनावर लक्ष देऊन पाहिलें असतां हा निषेध उभयतांसही लागू आहे असें होतें; कारण ज्यास पुत्र असून ते पुत्र पतित किंवा महारोगग्रस्त, किंवा पुढील संततीस निरुपयोगी नसतील त्या प्रसंगीं मात्र दत्तक घेण्याची अवश्यकता ग्रंथांत उत्पन्न होते यावरून आपत्काला शिवाय दत्तक पुत्र देऊं नये, व घेऊं नये, हा निषेध उभयतांनीं मानिला पाहिजे.

(दत्तक घेण्याचा अधिकार कोण कोणत्या प्रसंगीं आहे.)

शौनकः

अपुत्रोमृतपुत्रोवा॥ वंध्यावामृतपुत्रावापुत्रार्थं समुपोष्यच ४

ज्या स्त्री पुरुषांस संतती होण्याचा संभव असून संतती होत नसेल, अगर ज्या स्त्रीचा नवरा ऋतु प्राप्त होण्याचे पूर्वीं किंवा नंतर मयत झाला असेल, अगर ज्या पुरुषाची निपुत्रीक बायको मयत झाली असोन, त्या पुरुषाचा हेतु लग्न करण्याचा नसेल, किंवा ज्या स्त्री पुरुषास संतती झाली असून मयत असतां नवरा बायको किंवा नवऱ्याच्या अभावीं बायको, व बायकोच्या अभावीं नवरा यास, आपले श्राद्धादिक पार लौकिक क्रिया व नाव लौकिक याचा लोप होऊं नये एतदर्थ पुत्राचा प्रतिनिधी म्हणजे दत्तक पुत्र घेण्याचा अधिकार आहे.

पंक्ति. दत्तमिमांसा.

नस्त्रीपुत्रंदद्यात्प्रतिगृण्हीयाद्वाअन्यत्रानुज्ञानात्
भर्तुरितितुसधवायाएव:॥ विधवायास्तुज्ञात
नुमत्यापिभवति अभावेज्ञातयःस्तेषामितिवच
नात्॥ स्त्रीणांहोमानधिकारेपिब्राह्मणद्वारक
तेव: स्त्रीशूद्राःसधर्माणः इतिविशेषवचनात्

दत्तक प्रकरण.

नवरा जिवंत असून दत्तक घेण्या विषयीं आज्ञा देण्यास लायक असेल तर त्याचीच आज्ञा घेऊन दत्तक घेणें तो घ्यावा. इतरांची आज्ञा घेण्याचें कारण नाहीं. नवरा मृत, किंवा पतित, अथवा भ्रष्ट, अगर वेडा, अगर आज्ञा देण्यास असमर्थ असेल, तर अशा प्रसंगीं निपुत्रीक स्त्रीनें दत्तक घेणे तो सासू, सासरे, व ज्ञाती इत्यादिकांची आज्ञा घेऊन, राजास कळऊन, शास्त्रोक्त, विधिपूर्वक, होमादिक वगैरे कर्म ब्राह्मणद्वारा करवून दत्तक घेण्यास स्त्रीलाही पुरुषा प्रमाणें अधिकार आहे; परंतु नवरा असेल तर त्याची व तो नसेल तर भाऊ बंदाची आज्ञा घेतल्या वांचून दत्तक घेण्याचा अधिकार स्त्रियांस स्वतंत्र नाहीं असें समजावें.

कोणता पुत्र दत्तक घ्यावा व तो देण्याचा अधिकार कोणास आहे.

वसिष्ठः

शुक्रशोणितसंभवः पुरुषोमातापितृनिमित्तकस्तस्य दान विक्रयपरित्यागेषुमातापितरौप्रभवतः नत्वेकं पुत्रंदद्यात्॥ प्रतिगृण्हीयाद्वासहित्रायतेपुरुषान्नज्येष्ठं दद्यात्नप्रतिगृह्णीयादेति॥ मातापितावादद्यातांयमद्भिः पुत्रमापदीतिशौनकीयात्॥ बहुपुत्रेणकर्तव्यंपुत्रदानं प्रयत्नतः॥ ज्येष्ठस्मातापितुःसमइतिवचनात्॥ माता पित्रोरभावेपितृसमै रपिदातव्यं॥६॥

ज्यास अनेक पुत्र आहेत त्याणें जन्म जेष्ठ ह्मणजे प्रथमतः उत्पन्न झालेला पुत्र, व अवशिष्ट ज्येष्ठ म्हणजे वडील पुत्र मरण पावल्या नंतर बाकी राहिलेल्या पुत्रां मध्यें जो वयानें मोठा असेल तो असे अनुक्रमानें पूर्वीचा पुत्र मरण पावल्या नंतर जो अवशिष्ट असेल त्या पुत्रास सोडून बाकी कनिष्ठ किंवा मध्यम जे पुत्र राहिले असतील त्या पैकीं ज्या पुत्रास चौथे कलमांत सांगितलेल्या आपत्कालीं विधिपूर्वक रीतीनें आई, बाप, किंवा आईच्या अभावीं बाप व बापाच्या अभावीं आईला उभयतांसच मुख्यत्वें करून देण्याचा अधिकार आहे. कारण आई, बाप, यांच्या वीर्यापासून पुत्राची उत्पत्ती होते म्हणून वशिष्ठ ऋषींनी सांगितलें आहे. त्याजकरितां पुत्राचें दान किंवा विकरी अगर बक्षीस करणें झाल्यास आई, बाप याणींच करावें. जर हे दोघे नसून दत्तक देण्याचा प्रसंग अवश्य असल्यास मान

वडील बंधूनेंही दत्तक द्यावा. कारण वडील बंधूस आई बापाचे ठिकाणीं मा
ला आहे. म्हणोन त्याणेंही द्यावा. या शिवाय दत्तक देण्याचा अधिकार इतरां
आहे. असें उघड कोणेही सांगितलें नाहीं, ह्मणोन इतरांनीं देऊं नये, हें सिद्धा

कोणत्या अनुक्रमानें दत्तक घ्यावा याज बद्दल विचार–

शौनकः

ब्राह्मणानांसपिंडेषुकर्तव्यःपुत्रसंग्रहः
तदभावेसपिंडेवाअन्यत्रतुनकारयेत् ७

ब्राह्मणा मध्यें दत्त पुत्र घेणें तो सपिंडज म्हणजे सात पिढ्यांतील जवळ
चा आपला सखा भाऊ असेल त्याचा … मुलगा घ्यावा. कारण ९ बहूनामेक
जातानामेकश्चेत्पुत्रवान् भवेत् ॥ सर्वेतेनेवपुत्रेणपुत्रिणोमनु
ब्रवीत् ॥ अनेक सख्या भा… व्या पैकीं कोणी एखादा भाऊ पुत्रवान असल्यास
त्या पुत्राच्या योगानें इतर नि… पुत्रीक भाऊही पुत्रवान होतात, असें मनु म्हणतो
आहे. याजवरून दत्तक घ… घ्यावा अशी कांहीं संधी रहात नाहीं; परंतु आपला
स पृथक पुत्र असावा … अशी ज्याची इच्छाच असेल त्याणें दत्तक घेणें
आपल्या सख्या भावा… चाच मुलगा मुख्यत्वें करून दत्तक घ्यावा. जर सख्
भावाचा मुलगा नसे… ल तर सावत्र भावाचा या अनुक्रमानें सात पिढ्यांतील
जे असतील तेच घ… वे. जर सात पिढ्यांतील नसतील तर असपिंड स
त्र म्हणजे आठव्या … पिढ्यां पासून चवदा पिढ्यांतील जे पुत्र असतील ते
वरील अनुक्रमानें … घ्यावे. कदाचित ते नसतील तर आसमानोदकसगोत्रज म्ह
जे १५ व्या पिढी … पासून एकविसाव्या पिढींतील जे असतील त्याचे पुत्र व
ल अनुक्रमानें … घ्यावे. व तोही नसेल तर आसमा नोदक अस गोत्रज म्ह
जे २२ व्या पिढी… पासून २८ पिढींतील जो असेल त्याचा घ्यावा. त्या खेरीज
इतर कोणत… ही दत्तक घेऊं नये.

श्लोक·शौनकः

क्षत्रियाणांस्व जातौवैगुरुगोत्रसमोपिवा

सपिंड, … यां मध्यें दत्तक घेणें असेल तर आपल्या जातींतील सपिंड व
नसती … वरील ६ वे कलमांतील नियमा प्रमाणें घ्यावा; जर सपिंड व असपिं
डी … ल तर गुरु गोत्रादि समान गोत्रज स्वजातीय जो मुलगा असे
… घ्यावा.

शौनकः

वैश्यानांवैश्यजातेषु

वैश्य म्हणजे वाणी जातींतील निपुत्रिक यांणीं वरील साहावे व सातवे कलमांतील नियमा प्रमाणें स्वजातीय सपिंड व असपिंड यास दत्तक घ्यावा. या जातींत गुरुगोत्राचे समान गोत्रज्यांचा दत्तक होत नाहीं.

शौनकः

शूद्राणांशूद्रजातिषु॥दौहित्रोभागिने यश्चशूद्रस्यापिचदीयते॥९॥

शूद्रवर्णा मध्यें वरील ६ वे कलमा प्रमाणें सपिंड व असपिंड व नसेच दुहित्र म्हणजे मुलीचा मुलगा व भागिनेय म्हणजे बहिणीचा मुलगा असे ही एकंदर आपले जातींतील दत्तक होतात.

शौनकः

शौनकोहंप्रवक्ष्यामिपुत्रसंग्रहमुत्तमं॥ वंध्यावामृतपुत्रावापुत्रार्थंसमुपोष्यच॥वाससीकुंडलेदत्वाउष्णीषंचांगुलीयकं॥आचार्यंधर्मसंयुक्तंवैष्णवंवेदपारगं॥ बर्हिःकुशमयंचैवपालाशंचेध्ममेवच॥एतानाहृत्यबंधूंश्चज्ञातीनाहूयतत्वतः॥ बंधूंश्चान्नेनसंपूज्यब्राह्मणांश्चविशेषतः॥अन्वाधानादियत्तंत्रंकृत्वाज्योतवनादिकं॥दातुःसमक्षंगत्वातुपुत्रंदेहीतियाचयेत्॥दानेसमर्थोदातास्मैयेयज्ञेतिचपंचभिः॥देवस्यत्वेतिमंत्रेणहस्ताभ्यांप्रतिगृह्यच॥ अंगादंगेत्यृचंजप्त्वाचाघ्रायशिशुंमूर्धनि ॥ वस्त्रादिभिरलंकृत्यपुत्रछायागतंशिशुं॥नृत्यगीतैश्चवाद्यैश्चस्वस्तिशब्दैश्चसंयुतः॥गृहमध्येत्वाधायचरुंहुत्वाविधानतः स्विष्टकृदादिशेषंचकृत्वाहोमंसमापयेत्॥ १०

दत्तक कोणत्या रीतीनें घ्यावा याज बद्दल विधी.

निपुत्रिक स्त्री, किंवा पुरुष यांणीं दत्तक घेण्याचे दिवशीं उपवास क... व कानें, व कुंडलें, व आंगट्या, शेला, पागोटें इत्यादि अलंकार व दर्भ, समि... धा इत्यादिक होमास उपयुक्त पदार्थ घेऊन, आपल्या उपाध्यास व आप...

भाऊबंद, ज्ञाती इत्यादिकांस बोलाऊन, सरकारास कळऊन त्या दिवशीं ब्राह्मण भोजन व ज्ञाति भोजन करून अग्न्याधानादि तंत्रांत सांगितलेले आज्यीसवनादिक कर्मे करून ज्याचा पुत्र घेण्याचा असेल त्याच्या समक्ष जाऊन सर्वांचे देखत मला पुत्र द्या असें ह्मणावें व ग देणाराने मी पुत्र देण्यास समर्थ आहें, असें सांगितल्या नंतर त्याच्या मुलास आपले जवळ घेऊन त्याचा अंगस्पर्श करून, मस्तक हुंगून, व त्यास वस्त्रादिकांनीं अलंकारयुक्त करून आपल्या घरीं समारंभानें वाजत गाजत आणून त्याजबरोबर होम वगैरे करून त्यास पुत्रास्तक घ्यावा.

पंक्ति. दत्तमिमांसा.

असगोत्रजःसंस्कृतोनग्राह्यः॥पितुर्गोत्रेणयःपुत्रः संस्कृतःपृथिवीपते॥आचूडांतंनपुत्रःसःपुत्रतां यातिचान्यतः॥दत्ताद्याअपितनयानिजगोत्रेणसं स्कृताःचूडोपनयसंस्कारानिजगोत्रेणसंस्कृताः॥द त्ताद्यास्तनयास्तेस्युरन्यथादासउच्यते॥गृहीत्वाथंच वर्षीयंपुत्रेष्टिंप्रथमंचरेत्॥११॥

असगोत्र ह्मणजे आपल्या गोत्राशीं भिन्न गोत्र दत्तक घेणें असेल तर किती वयाचा घ्यावा याचा विचार ज्या मुलाचें चौल व(जावळ काढणें) किंवा उपनयन (मुंज्य) झालें नसोन सुमारें पांच वर्ष वयाचा असेल तशा मुलास पूर्वीं सांगितल्या विधिपूर्वक दत्तक घेऊन पुत्रेष्टि व चौल उपनयन वगैरे संस्कार आपल्या शाखेंतील मंत्रानें करावे ह्म णजे तो दत्तक यथाशास्त्र होऊन आपल्या गोत्रांत येतो, पांच वर्षांहून अधिक वयाचा दत्तक घेतल्यास तो यथाशास्त्र होणार नाहीं. असें विज्ञानेश्वर, व मयूख, व वीरमित्रोदय इत्यादिक ग्रंथांत सांगितलें आहे.

दत्तकौस्तुभेवसिष्ठः

अन्यशाखोद्भवोदत्तःपुत्रश्चैवोपनायितः॥स्वगोत्रेण स्वगृह्योक्तविधिनागोत्रतामियात्॥स्वशाखाभाग्० १२

दत्त कौस्तुभ प्रकार यांणीं मौंजी बंधन झाल्यावरही असगोत्री दत्तक घ्यावा असें सांगितलें आहे, परंतु त्या ग्रंथावर भरवसा ठेवण्या जोगा नाहीं. कारण एक देशी मत असून त्याजवरून चालल्यास बहुत ग्रंथास विरोध येतो म्हणोन तसें करणें युक्त नाहीं.

पंक्ति. दत्तमिमांसायांचपरंमयूखे.

सगोत्रदत्तकस्यनायंनियमइतिपरिणीतउत्पन्नेपु

गोपिदत्तकोभवति इतिभावः १३

नियम

सगोत्री दत्तक घेणें असल्यास त्याचें वय अमुक असावें असा कांहीं शास्त्रांत स्पष्ट सांगि तला नसून सगोत्री पुत्रवानही दत्तक होतो असें कांहीं ठिकाणीं सांगितलें आहे त्याजवरून पाहतां कितीही वर्षांचा सगोत्री मुलगा असेल तरी त्यास दत्तक घ्यावा असें होतें.

चारी वर्णांतील लोकांनीं दत्तक घेणें तो आप आपले जातींतील घ्यावा असें वरील कलमा वरून होतें, याजकरितां देशस्त, कोंकणस्त, व द्रविड, श्री वैष्णव, इत्यादिकांचीब्राह्मणां मध्यें गणना आहे, अर्थात देशस्तांनीं कोंकणस्थाचा तसेंच द्रविडांनीं श्री वैष्णवांचा दत्तक घेतला असतां हरकत नाहीं असें किती एक लोकांचे संशय आहेत त्याचें समाधा न खालचे कलमा वरून होईल.

श्लोक. शौनक:

सर्वेषामेववर्णानांज्ञातिष्वेवनचान्यत: १४

वरील साहावे, सातवे, आठवे, नववे, कलमांत दत्तक घेण्याचा प्रकार सांगितला- आहे तो ज्याची शाख व जात व वर्ण ज्या प्रमाणें असेल तशांचा (त्यांतील आपली हा ती म्हणजे शरीर संबंध ज्याशीं होण्याचा संभवआहे) मुलगा दत्तक घ्यावा असें सांगित लें आहे म्हणोन कोंकणस्तांनीं देशस्ताचा व देशस्तानीं श्री वैष्णवांचा अशा प्रमाणें ज्याच्या शरीर संबंध होत नाहीं त्यांणीं एक मेकांचा दत्तक घेऊं नये; असा निबंध स्मृतिकारांनीं के ला असोन या प्रमाणेंच दत्तकौस्तुभ व दत्तमीमांसा इत्यादि ग्रंथकारांचेंही मत असून त्यां णीं आख्याही अशीच केली आहे.

पंक्ति. दत्तमीमांसा.

अपुत्रेणसुत:कार्य:यादृक्तादृक्प्रयत्नत: इति ॥ अत्र पुत्रपदंपौत्रप्रपौत्रयोरुपलक्षणम् ॥ तस्मात्पुत्रपौत्रप्रपौत्रा: यस्ययासांवाअन्यतरा: संतिते: दत्तपुत्रोनग्राह्य: ॥ १५ ॥

कोणी कोण कोणते दत्तक पुत्र घेऊं नये याचा विचार-

ज्या पुरुषास किंवा स्त्रीस पुत्र, पौत्र, किंवा प्रपौत्र असतील त्यांणीं जवळचा सपिं डु सगोत्र सख्या भावाचा पुत्र दत्तक मिळत असेल तर इतर पुत्र घेऊं नये; कारण एका बापा पासून एका आईचे पोटीं झालेले सहोदर बंधू या पैकीं, एकाचास पुत्र झाला असतां बाकीचे बंधू सर्वही पुत्रवान् होतात असें मनुस्मृतिकारानें सांगित लें असोन या प्रकरणाचे सातवे कलमांत ज्या प्रसंगीं दत्तक घेण्याची संधी आहे त्या प्रसंगीं भावाचा पुत्र दत्तक घेण्यास योग्य असतां भिन्न मातृक किंवा भिन्न पितृक

यांचे पुत्र दत्तक घेऊं नये.

दत्तमीमांसा.

भ्रातृणामितिपुंस्त्वनिर्देशात्सोदराणांभ्रातृभगिनीनामपिपरस्परपुत्रग्रहीतृत्वाभावोवगम्यते ॥ वृद्धगौतमः ॥ ब्राह्मणादित्रयेनास्तिभागिनेयः सुतः क्वचित् भागिनेयपदंभ्रातृपुत्रस्याप्युपलक्षणं ॥ स्त्री पुंस्त्वजातिभेदादित्यलंविस्तरेण १६

आप आपल्या भावास परस्परांनीं दत्तक घेऊं नये, तसेंच आई बापाचे पोटीं जन्म घेतलेली बहीण भावंडें यांणीं परस्परें भावाचा मुलगा बहिणीनें व बहिणीचा मुलगा भावानें दत्तक घेऊं नये; परंतु बहिणीचा मुलगा बहिणीनें व भावाचा मुलगा भावानें असे परस्परें द्यावे व घ्यावे. कारण एक जात ज्याची असेल त्याणीं परस्परां दत्तक घ्यावा ह्मणोन जें येथें सांगितलें आहे तेथें जात या शब्दांत स्त्री पुरुषांचा समावेश करावा.

दत्तमीमांसा.

अपुत्रस्यपितृव्यस्यतत्पुत्रोभ्रातृजोभवेत् ॥ सएवतस्यकुर्वीतश्राद्धपिंडोदकक्रियामिति ॥ बृहस्पतिपराशरस्मरणात् ॥ १७ ॥

दत्तक घेतल्या वांचून कोणाचा पुत्र दत्तक घेतल्या प्रमाणें होतो.

निपुत्रिक मयत चुलत्याचा पुत्र ह्मणजे पुतण्या हा दत्तक घेतला नसोनही मयताच्या जिंदगीचा वारस होतो. आणि मयताचें श्राद्धादिक पिंडक्रिया त्याणेंच करावी असें आहे ह्मणोन पुतण्या हा मात्र विधिपूर्वक दत्तक घेतल्या वांचून पुत्र होतो.

दत्तकौस्तुभे.

दुहितृभागिनेयवर्जंविरुद्धसंबंधापत्यापुत्रत्वंबुध्यन्त्येभ्रातृपितृव्यमातुलवर्जंच ॥ तथास्त्रीवर्जंच ॥ १८ ॥

दत्तक घेणारास दत्तक होणाराचें नातें पुत्राप्रमाणें असून दत्तक होणाराच्या मातुश्रीशीं दत्तक घेणाराचा विवाह केला असतां तर योग्य होता असा संभव असला पाहिजे; तसा संभव नसेल तर दत्तक घेऊं नये, असे जे शास्त्राने निषेध केले आहेत ते अनुक्रमानें सांगतों.

१. दौहित्र ह्मणजे दत्तक घेणाऱ्याच्या मुलीचा मुलगा व नातु वगैरे.

२. भागिनेय ह्मणजे दत्तक घेणाऱ्याचे बहिणीचा मुलगा.

३. भ्रातृज म्हणजे दत्तक घेणारी जी स्त्री तिच्या भावाचा मुलगा.

४. भ्राता ह्मणजे दत्तक घेणाऱ्याचा सख्खा, व सावत्र, व चुलत, बंधू.

५. कन्या, स्त्री, दत्तक होत नाहीं- कारण पुत्राच्या ठिकाणीं यांस मानिल्यानाहींत.

६. पितृव्य ह्मणजे दत्तक घेणाऱ्याचा चुलत चुलता व बाप, आजा, पणजा, इत्यादि.

७. मातुळ ह्मणजे दत्तक घेणाऱ्याचा मामा व अशा नात्याचे जे असतील ते.

८. आत्म बंधू ह्मणजे दत्तक घेणाऱ्याचे मामीचा, मावशीचा, आतेचा, मुलगा.

९. पितृबंधु ह्मणजे दत्तक घेण्याऱ्याचें बापाच्या आतेचा व मावशीचा व मामीचामुलगा

१०. मातृ बंधु ह्मणजे आपले आईच्या मावशीचा व मामीचा मुलगा.

नारदः

आचार्यमित्रभगिनीसखिशिष्यपुत्रः प्राव्राजिकः श्वशुरज श्चसगोत्रजश्च॥ साध्व्यधात्मकृत्तम वर्णजश्चतथैवपुत्रः श रणागतायाः १॥ आचार्यपुत्रमारभ्यशरणागतपुत्रकाः॥वि रुद्धबंधुसंबंधा दत्तकत्वेतु वर्जिताः॥ १९॥

कोणत्या स्त्रीशीं व्यवहार झाला असतां मातेशीं गमन केल्या सारखें होतें, या विषयीं विज्ञानेश्वर ग्रंथकार यांणीं स्त्रीसंग्रहण प्रकरणांत विस्तार केला आहे; आतां या दत्तक प्रकरणांत दत्तक होणाऱ्याची मातोश्री, दत्तक घेणार याची बायको किंबहुना लग्न झालें असतें तर होती अशा नात्याचा समावेश होणारी भावजयेअ सली पाहिजे, ह्मणोन लिहिलें आहे, तेव्हां दत्तक घेणें तो खालीं जे पुत्र दर्शविले आहेत तशा पुत्रांस घेऊं नये. कारण जर दत्तक घेतला असतां त्या पुत्राच्या माईच्या ठिकाणीं दत्तक घेणाऱ्याच्या बायकोचा समावेश होतो. अर्थात त्या पुत्रास दत्तक घेतले असतां दत्तक घेणारा मात्र गमन करण्यास प्रवृत्त झाल्याचा दोषी होतो. तसेच जो दोषी झाला त्यास कोणतेंही कर्म करण्याचा अधिकार नाहीं. व विरुद्ध बंधु संबंधा मुळें त्या पुत्रास दत्तकही घेऊं नये, असें होतें याजकरितां ते पुत्र कोण कोण ते ते खालीं दर्शवितों :-

१. आच्यार्य पुत्र ह्मणजे आपल्यास मंत्रादीक उपदेश करणारा जो गुरू त्या त्या पुत्र.

२. मित्र पुत्र ह्मणजे स्नेही याचा मुलगा.

३. भगिनी सखी पुत्र ह्मणजे बहिणीच्या मित्रिणीचा मुलगा.

४. सत्शिष्य पुत्र ह्मणजे आपल्या पाशीं मंत्रोप देश घेतल्याचा मुलगा.

५. प्राव्राजिक ह्मणजे संन्याशा प्रमाणें वागणारीचा मुलगा.

६ स्वस्रजन्य ह्मणजे, सासूचा मुलगा म्हणजे मेहुणा.

७ सगोत्रज ह्मणजे आपल्या गोत्रांत उत्पन्न झालेली जी तिचा मुलगा.

८ साध्वीय ह्मणजे पातिव्रत्यानें वागणारीचा मुलगा.

९ धात्रीय आपरूं दाईचा मुलगा.

१० उत्तम वर्णज ह्मणजे आपल्याहून जे श्रेष्ठ त्या जातींतील मुलगा.

११ शरणागता पुत्र ह्मणजे आपल्यास जी शरण आलेली तिचा मुलगा.

अशा प्रकारचे पुत्र दत्तक घेऊं नये असें समजावें.

ग्रंथकार.

ब्रह्मचारी व सन्यासी या उभयतांनीं दत्तक घ्यावा किंवा नाहीं? याजबद्दल पुत्र होण्याचा संभव असून कोणी मनुष्य निपुत्रीक किंवा मृतपुत्रक असेल तर त्या पीं दत्तक घ्यावा असें मागें सांगितलें आहे याजकरितां ब्रह्मचारी याची गणना लग्न होई तों पर्यंत निपुत्रिकांत होत नाहीं म्हणून त्याणें दत्तक घेऊं नये.

तसेंच सन्यासी याची गणना निपुत्रिकांत होत नाहीं कारण सन्यास घेते वेळेसच (काम्यानांकर्मणान्यासंसन्यासंकवयोविदुः॥ इ. भ. गी. इतिभगवद्गीतोक्तेः) सर्व काम्य कर्म व अधिक अमुष्मिक कर्मांचा त्याग करून केवळ मुक्तीच मिळावी अशा हेतूनें आश्रम घेतला असून त्याणें अरण्यांत राहून उपजीविके करितां सिद्धान्न भिक्षा मात्र मागावी या खेरीज त्याणें दानादिकें करून द्रव्य वगैरे संपादन करूं नये, असें सन्यास धर्मांत सांगितलें आहे; या प्रमाणें जो वागणूक करितो तो उत्तम गतीस जातो. अशा प्रसंगीं पुत्रांनीं पारलौकिक क्रिया केल्यानेंच उत्तम गतीस जातो, असें नाहीं ह्मणोन सन्याशास जो नियम सांगितला आहे, त्या नियमाचें उल्लंघन करून दत्तक म्हणून एखादा पुत्र घेईल तर तो आपल्या धर्मांतून भ्रष्टही किंबहुना झाल्या प्रमाणें होईल; याजकरितां सन्याशांनीं दत्तक घेऊं नये, दानादिकें करून द्रव्य संपादन करूं नये, असें शास्त्रांत सांगितलें आहे; परंतु गुरु अथवा आचार्य अशा स्थानींमानून कोणी कोणत्याही रीतीनें धन अर्पण केलें असेल तर तें धन शिष्यांनीं घ्यावें; असें दायविभागांत सांगितलें आहे. अर्थातच दत्तक घेऊं नये.

श्लोक. शौनकः

वंध्यावामृतपुत्रावेत्यत्र पुत्रपदंपुत्रपौत्रप्रपौत्रयोरुपलक्षणं २७

ज्यास मुलगा किंवा नातु किंवा पणतु या तिघां पैकीं कोणीही असल्यास

ते निपुत्रीक होत नाहींत, ह्मणोन या वचनाचा अर्थ आहे. याजकरितां सुनेनें द त्त घेतला असेल तर सासूनें दत्तक घेऊं नये, हें उघडच आहे; परंतु पूर्वी सासूनें दत्तक घेतला असेल तरी सुनेनें दत्तक घेण्या विषयीं प्रतिबंध नाहीं. कारणसासूनें जो पुत्र दत्तक घेतला त्याचा समावेश सुनेच्या पुत्राच्या ठिकाणीं होत नसून सूनही निपुत्रीक राहते ह्मणोन सुनेनें दत्तक घेतला असतां सुनेच्या दत्त पुत्राचा व सासूच्या दत्तपुत्राचा वारसा तुलता व पुतणपणा या प्रमाणें होईल असें समजावें.

श्लोक. मनुः

सर्वासामेकपत्नीनामेकाचेत्पुत्रिणीभवेत्॥सर्वास्तेतेनपुत्रेण पुत्रिणोमनुरब्रवीत् २१

एका पुरुषास एक किंवा त्याहून अधिक स्त्रिया असून पैकीं एखादीस अवरस असेल किंवा नवरा असतां गरोदर असून नवरा मयत झाल्याचे पश्चात् पुत्र झाला असेल किंवा तसाच दत्तक घेतला असेल तर राहिलेल्या स्त्रियांस दत्तक घेण्याची संधी राहात नाहीं. कारण एकंदर बायकांतून कोणा एखादीस दत्तक किंवा अवरस पुत्र असेल तर बाकीच्या सर्व निपुत्रीकही पुत्रवान होतात, असें मनूनें सांगितलें आहे; याजकरितां दत्तक घेण्याची संधी इतरांस राहात नाहीं.

नारदः

यद्दत्तंस्यादविज्ञानाददत्तमितितत्स्मृतमिति॥अतेगृण्हात्य दत्तंयोमोहाद्यश्चप्रयच्छति॥अदेयदापकोदंड्यस्तथाद त्तप्रतीच्छकइति॥२२॥

जन्म जेष्ट, किंवा अवशिष्ट ज्येष्ट, अगर मुलचा एकच असेल तर तोही दत्तक देऊं नये, असें मागें सांगितलें आहे; परंतु जर अशा पुत्रास कोणी दत्तक देईल किंवा घेईल तर त्याचा परिणाम काय व्हावा? याज बद्दल विचार दत्तप्रदानीक प्रकरणांत असें सांगितलें आहे कीं, जर कोणतीही वस्तु न समजतां किंवा शास्त्रांत जे मुद्दाम निषेध सांगितले आहेत ते न समजतां किंवा जाणून बुजून नेमाचें उल्लंघन करील तर ती सदरहू वस्तु दिल्या प्रमाणें होत नसून परत ही व्हावी, आणि त्याजबद्दल देणारे व घेणारे यांजकडून राज्यानें दंडही घ्यावा, असें सांगितलें आहे याज करितां जन्मजेष्ट, किंवा अवशिष्टजेष्ट अगर मुलांचा एक पुत्र असून तो कोणी देईल किंवा घेईल, तर तो पुत्राच्या अधिकारप्रत न पावतां, दासपणाप्रत पावून दत्तक देणारा, व घेणाराच्या क्रिया क

कर्मांतर वगैरे करण्याचाही अधिकार त्यास येत नाहीं. एतदर्थ दत्तक दिला सेल त्यास परत घ्यावा; परंतु तो पुत्र असगोत्री दत्तक दिला असेल तर घेणारानें जे संस्कार वगैरे केले असतील, तिनके संस्कार दासपणातून होण्या करितां ज्याचा पुत्र असेल त्यांणीं करून परत घ्यावा. जर तो पुत्र न असेल तर संस्कार न करितां तसाच परत घ्यावा. कारण दत्तक देणाराचें व घेणाराचें गोत्र, एकच आहे, याजकरितां संस्कार करण्याचें कारण नाहीं. भिन्न गोत्र असेल तरमात्र आपले गोत्रांत घेण्या करितां संस्कार केले पाहिजेत.

श्लोक.

यःशास्त्रविधिमुत्सृज्यवर्ततेकामकारतः॥नससिद्धिमवाप्नोतिनसुखंनपरांगतिं॥इतिशास्त्रेउक्तत्वाच्छास्त्रमर्यादयैवसर्वैस्थेयम् २३

कोणतेंही कृत्य करणें झाल्यास शास्त्रांत जी मर्यादा व नियम व विधी सांगितले आहेत, त्यांचें उल्लंघन करून स्व इच्छेनें एखादी क्रिया करितो तो कोणताही सिद्धी मत पावत नसून दोषी होतो असें दत्त ब्रह्मोध्य प्रकर्णांत सांगितलें आहे. याज करितां शास्त्राची आज्ञा उल्लंघन करूं नये. केल्यास राजदंडास पात्र होईल.

वीरमित्रोदय पंक्ति.

ऋणमात्मीयवत्पित्र्यमित्यादिनाआत्मीयमृणंआवश्यदेयमितिसिद्धति॥यदिविधिवद्दानंनजातंतदापरिक्रीयपुत्रत्वात्पुत्रस्तेजनयितुरेवस्यइतिजनयितृऋणस्य हरोपीतिनाहत्रऋणस्याहृणंदापनीयं॥यदिविधिवद्दानसंपत्तिस्तदागोत्ररिक्थेजनयितुर्नभजेद्कृत्रिमःसुतइत्यास्मृतिभिः जनयितृपुत्रत्वाभावात्पुत्रपौत्रैऋणंदेयमितिविधिरेवनप्रसज्यत इतिबोध्यम्॥शौनकयाज्ञवल्क्यवचनात्॥

अ या नावाच्या मनुष्यानें दत्तक होण्याचे पूर्वीं कर्ज करून तें न फेडतां आई बाप यानीं दत्तक दिल्या कारणानें ब यास दत्तक झाला; पुढें पहिल्या घराण्यातील आई बाप मयत झाले असून त्यांजला दुसरे कोणी वारस नसतां त्याची इस्टेटही नाहीं या कारणानें सावकार याणें दत्तकावर पहिल्या कर्जा बद्दल फिर्याद केली तर ती फिर्यादसदईदत्तकावर चालेल किंवा नाहीं? अशी

पहिले घरीं असतां कर्ज करून नंतर दत्तक झाला असेल तरी दत्तक झाल्यावर कर्जाचे जबाबदारींतूनतोमोकळा होत नाहीं; याजकरितां ज्या घरीं दत्तक झाला त्या घरीं त्याची तेथें मिळकत असेल त्या मिळकतीपर किंवा खुद्द त्याजवरच फिर्यादीचा निवाडा होण्यास हरकत नाहीं.

श्लोक. अत्रि:

अपुत्रेणैवकर्तव्यःपुत्रःप्रतिनिधिःसदेतिवचनात्पूर्वगृहीतदत्तकोयद्यग्राह्मोयोअन्यायोवानेत्तनिवर्तयितव्यः॥ द्वितीयोग्राह्यश्चः अपुत्रत्वरूपाधिकारित्वस्यनिराबाधात्॥

अ हिणें ब या नावाचा पुत्र दत्तक घेतला असून पुनः ती दुसरा घेण्यास इच्छिते, तर तिजला दत्तक घेण्याचा अधिकार आहे किंवा नाहीं? अशी शंका घेऊन निवारण-

जर अ हिणें पूर्वी ब या नावाचा घेतलेला दत्तक वरील नियमा प्रमाणें विधियुक्त व घेण्यास लायक नसोन घेतला असेल तर मात्र तो रद्द होऊन दुसरा दत्तक घेण्यास हरकत नाहीं. जरतो घेण्यास लायक असोन विधियुक्तही घेतला असेल तर जों पर्यंत तो दत्तक पुत्र किंवा त्याचे पुत्रपौत्रादिक वंश जिवंत असती ल तों पर्यंत पुनः दत्तक घेण्यास कांहीं मार्ग नाहीं, असें समजलें पाहिजे.

काशीनाथोपाध्यायविरचितेधर्मसिंधुसारेतृतीयपरिच्छेदे दत्तक प्रकरणस्यमेतद्वाक्यम्

असंभवेसगोत्रसपिंडेषुकृतोपनयनोपिविवाहितोपि दत्तकोभवति॥ असंजातपुत्रएवविवाहितोग्राह्यइतिमे प्रतिभाति

अ या नावाचे मनुष्यास ब व क असे दोन पुत्र असतां त्या पुत्रां पैकीं ब यास पहिल्या घरीं एक पुत्र झाला असून अ नें ड यास ब याजला विधिपूर्वक दत्तक दिला; नंतर ब हा आपल्या बायकोसहवर्तमान दत्तक घरीं गेला नंतर त्यास तेथें दोन पुत्र होऊन पुढें ब हा मयत झाला, कांहीं दिवसानीं ब याजला पहिल्या घरीं झालेला पुत्र दत्तक घरीं झालेल्या पुत्राजवळ आपला हिस्सा मागतो, तसेच दत्तक घरीं झालेले पुत्र पहिल्या घरीं झालेल्या पुत्राजवळ आपला हिस्सा मागतात, तर या उभयतांसही परस्परें आपआपले हिस्से मागण्याचा

अधिकार आहे किंवा नाहीं, तसेच अ याणें आपला पुत्र ड यास दत्तक दि ला तो यथा शास्त्र आहे किंवा नाहीं, जर ब हा विधियुक्त दत्तक झाला असे ल तर तो अशास्त्र होईल किंवा कसें? अशी शंका घेऊन निवारण.-

अ याणें ब याजला जो दत्तक दिला याजबद्दल शास्त्रांत स्पष्ट वचन को ठेंही नाहीं. आतां मयूखकार यांचें ह्मणणें पुत्रवान दत्तक घेतला असतां (दत्तकस्तुपरीणीतेऽसन्पुत्रोपिभवतीतितातचरणाः॥युक्तंचैतबाधकाभावात्) बाधक नाहीं असें आहे; परंतु वरील ग्रंथकार यांचें ह्मणणें पुत्रवान दत्तक घे णें हें सयुक्तिक नसावें असें आहे तर आतां सारासार विचार पाहिला असतां उ भयतांचेंही ह्मणण्यास अनूकूलता मुळींच नाहीं; परंतु उघड दिसतें कीं, जर पुत्रवान दत्तक घेतला असतां जो दत्तक होतो तो मात्र विधियुक्त होतो; परंतु दत्त क झालेल्याच्या पहिल्या घराण्यांतील पुत्राचा विधि दत्तक झालेल्या घराण्यांत होत नाहीं याज करितां पहिल्या घरांत झालेला पुत्र दत्तक झाल्या नंतरझा लेले दत्तकाचे पुत्र हे परस्पर बंधू प्रमाणें होतनसून त्यांचा विभाग परस्परही घेण्यास अधिकार नाहीं हें सिद्ध आहे, असें वाटतें.

राजकीय नियम.

सरकारची सर्क्युलर पत्रें रिविन्यु कमिशनर साहेबवकलेक्टर साहेब यांस सादर झालीं त्यां- तील हांशील.

नंबर २८२९ तारीख ५ अकटोबर सन १८३७ इसवीचें झालें त्यां त हांशील- गांवचे वतनदार पाटील कुळकर्णी यांस आपले कुटुंबांतील भाऊबंदांच्या सल्ल्यानें दत्तक मुलगा घेण्यास इच्छित असेल त्याचे वतन र पये शंभर राहून ज्यास उत्पन्नाचें नसेल त्या प्रसंगीं दत्तक घेण्याची परवा नगी देण्यास कलेक्टरास अधिकार दिला आहे.

नंबर २६५४ तारीख १४ माहे जुलई सन १८३९ यांत हांशील यादी तील सरदारांचे दत्तक घेण्या विषयीं हुकूम मागण्याच्या अर्ज्या सरदार लो कांचे एजंट साहेबांचे द्वारानें व इतर लोकांचे रिविन्यु अंमलदार यांचे मार्फत सरकारास येत जाव्या.

नंबर ३३६८ तारीख १९ माहे नवंबर सन १८४२ इसवीचें त्यांत हांशी ल- सरकारचे परवानगी शिवाय दत्तक घेतला असेल तर त्यांचा वंश परंपरे

नें त्या वर्षासनावर हक्क पोंचणार नाहीं.

नंबर २५४३ तारीख १ माहे आगष्ट सन १८४३ इसवी यांत हांशील दत्तक घेतल्यानें निरंतरचे हिसे वतनांत वाहाडतील तर तसे दत्तक घेण्यास परवानगी देण्यास नाकबूल करावें.

दक्षण रिवि॰ क॰ सा॰ यां॰–

नंबर ५२०९ तारीख १६ दिजंबर सन १८४७ इसवीचें पत्र आलें त्यांत हांशील देवस्थानें व मशीदी तसेंच मठ वगैरे यांस इनाम जमिनी सदोदित चालणाऱ्या असतील त्यांचे वहिवाटदारांनीं दत्तक घेण्या विषयीं सरकारची परवानगी घेण्याचें कारण नाहीं. व धर्मशाळा वगैरे यातऱ्हेचे कामाकडील जमिनी असतील त्या वारस नसल्यानेसरकारांतयेणाऱ्या असतीलतशाबाबदींत दत्तक घेण्यास सरकारचें सांगसन अवश्य पाहिजे.

नंबर १३० तारीख ११ ज्यानेवारी सन १८४८ इसवी यांतील हांशील ग्रामजोशी यांणें दत्तक घेणें झाल्यास सरकारचे परवानगीचे कारण नाहीं; परंतु त्याणें दत्तक घेतल्यावर मुलकी कामगारास कळवीत जावें.

नंबर ७५९ तारीख २९ फेबरवारी सन १८४८ इ. यांत हांशील– दत्तक घेण्या विषयीं परवानगी मिळण्या करितां परगण्याचे तसेंच गांवचे वतनदारांनें अर्ज पाठवीत जाव त्या प्रसंगीं दत्तक जो घ्यावयाचा त्यास वारसाचे नात्यानें वतनाचें उत्पन्न किती मिळेल तें लिहीत जावें.

नंबर ८१५१ तारीख १२ आगष्ट सन १८५१ यांत हांशील– सर्व वतनाचें उत्पन्न शंभर रुपयांहून अधिक नसेल त्या प्रसंगीं मात्र कलेक्टरास गावचे वतनदारास दत्तक घेण्याची परवानगी देण्याचा अधिकार आहे.

सदर दिवाणी अदालतीचे निवाडे.

नंबर २.

एक मनुष्य निवाड्या वरून तुरुंगात मरण पावला, म्हणून त्या निवाड्याचा ऐवज त्याच्या मुलाकडून वसूल करून घेण्या करितां फिर्याद झाली. त्या वरून एका मुलानें जाब दिला कीं, मला दुसऱ्या मनुष्यानें दत्तक घेतला आहे, म्हणून मी मयताच्या कर्जा विषयीं जबाबदार नाहीं; आणि दुसऱ्या मुलानीं असा जाब दिला कीं, आम्हीं कैदेंत राहण्यास पात्र होत नाहीं. या मुकदम्याचा सदर दिवाणी अदालतीनें असा फैसला केला कीं,

एका मुलाचें दत्तविधान झालें, असें शाबीत झालें आहे, यास्तव तो मयताच्या कर्जा विषयीं जबाबदार नाहीं, आणि दुसऱ्या मुलांस हिंदुशास्त्रा प्रमाणें आपल्या बा पाचें कर्ज फेडलें पाहिजे, परंतु त्याजबद्दल त्यांस कैद करूं नये. ता॰ २४ माहे जून सन १८२४. दा॰ रु॰ ८१२८३

नंबर.२१९०— एका स्त्रीनें आपला नवरा मयत झाल्यावर एका मुलास दत्तक घेतलें. नंतर तो मुलगा अज्ञान असतां तिनें आपल्या मयत नवऱ्याच्या जिनगीची अफरातफर करून कर्जही केलें. यास्तव त्या जिनगीचा खर्च कोणत्या रीतीनें केला याचा हिशोब घेण्याकरितां व हिशोब न दिल्यास नुकसानी बद्दल ३००० रुपये घेण्या करितां मुलानें दावा केला त्या मुकदम्यांत सदर दिवाणी अदालतीनें असें ठरविलें कीं, हिंदुशास्त्रा प्रमाणें आईचें खरें कर्ज दत्त पुत्रास फेडलें पाहिजे. यास्तव जिनगीचा खर्च कसा केला. याचा हिशोब तिला दिला पाहिजे. तसें तिनें केलें नाहीं या स्तव दाव्या प्रमाणें नुकसान भरून द्यावें. ता॰ २७ मार्च १८४७

समाप्त



अथ

दायविभागप्रकरणप्रारंभः

या प्रसंगी दायाच्या विभागाचा प्रकार सांगणें आहे या करितां दाय ह्मणजे हिस्सा या प्रत घेणारे कोण कोण आहेत हें समजल्या वांचून दायाचा वि भाग प्रथमतः सांगण्यास अडचण आहे एतदर्थ पुत्रा विषयीं विचार सांगतों:—

विज्ञानेश्वरपंक्ति.

औरसानौरस भेदेन द्विविधःपुत्रः १

अवरस अनौरस अशा प्रकारचे पुत्र दोघे आहेत त्यांत औरस पुत्र ह्मणजे काय हें प्रथमतः सांगतोः—

श्लोक.याज्ञ.

औरसोधर्मपत्नीजःउरसोजात औरसः २

औरस.ह्मणजे आपल्याशीं लग्न झालेल्यासजातीय स्त्रीस आपल्या पासून झालेला पुत्र, अनौरस ह्मणजे आपल्याशीं लग्न झालेल्या स्त्रीस परपुरुषा पासून झालेला; अगर आपल्याशीं लग्न न होतां ज्या स्त्रीस इतर सजातीय पुरुषाशीं लग्न लागलें असोन तिला तिच्या नवऱ्या पासूनझालेल्या पुत्रावर आपली मालकी कोणत्याही कारणानें पुत्रा प्रमाणें पोंचत असेल तो; अवरस व अनौरस या उभयतांस मुख्य व गौण पुत्र असे हा उपनाम शास्त्रकारानें दिलें आहे.

विज्ञानेश्वरपंक्ति.

सजातीय्यविजातीय्यभेदेनऔरसपुत्रोपिद्विविधः

औरस पुत्रांत किती भेद आहेत.

सजातीय विजातीय असे दोन भेद आहेत; त्यांत सजातीय औरस पुत्र ह्म णजे, ज्या जातीचे पुरूष त्याच जातींतील कन्येशीं विवाह करून तिजला आपल्या पासून झालेला जो पुत्र तो.

विज्ञाने॰पंक्ति.

विभिन्नजातीयस्त्रीपुरुषयोर्विवाहानंतरंतयोर्जातीयः पुत्रःसविजातीय्योरसः४

विजातीय औरस पुत्र ह्मणजे पुरुषाची एक जात व त्याहून स्त्रीची भि

न जात असून उभयतांशी लग्न लागल्या नंतर त्या स्त्रीस त्या नवऱ्या पासून झालेला. जो पुत्र तो.

अनौरस पुत्र किती आहेत.

१ श्लोक. या॰ तत्समः पुत्रिकासुतः) पुत्रिका सुत ह्मणजे आपल्या मुलीचा मुलगा, हा औरस पुत्रा प्रमाणेंच सर्व विषयीमालक समजावा. —

२ श्लो॰ या॰ क्षेत्रजः क्षेत्रजातस्तु) क्षेत्रज ह्मणजे आपल्या विवाहित स्त्रीस सजातीय गोत्र किंवा परगोत्र परपुरुषा पासून झालेला पुत्र.

३ श्लो. या. गृहेप्रच्छिन्नउत्पन्नोगूढजस्तुसुतस्मृतः) गूढज ह्मणजे आपल्या स्त्रीस आपल्यास नकळतां सजातीय्य पुरुषा पासोन आपल्या घरीं उत्पन्न झालेला पुत्र.

४ श्लो. या. कानीनः कन्यकाजातः मातामहसुतोमतः) कानीन ह्मणजे कन्यावस्थेंत लग्न होण्या पूर्वी जीस सजातीय्य पुरुषा पासोन उत्पन्न होतो तो त्यास मातामह सुत असेंही ह्मणतात.

५ श्लो. या. अक्षतायांक्षतायांवाजातःपौनर्भवस्तथा.) पौनर्भव ह्मणजे कोणत्याही एका स्त्रीचें लग्न प्रथमतः झाल्या नंतर कांहीं कारणानें आई बापानीं तिजला दुसऱ्यास लग्न किंवा पाट लाऊन दिल्या नंतर त्या स्त्रीस नाहाण आल्या पूर्वी किंवा पश्चात जो पुत्र पाटाच्या नवऱ्या पासून होतो तो.

६ श्लो. या. दद्यान्मातापितावायंसपुत्रोदत्तकोभवेत्) दत्तक आई बाप ज्या पुत्रास प्रीतीनें उदक दानपूर्वक सजातीय निपुत्रीक पुरुषास जो पुत्र देतात तो.

७ श्लो. या. क्रीतस्तुताभ्यांविक्रीतः) क्रीत ह्मणजे ज्या पुत्रास आई बाप विकत देतात तो.

८ श्लो. या. कृत्रिमस्यात्स्वयंकृतः) कृत्रिम ह्मणजे कोणीही धनाचा लोभ दाखवून ज्या मुलास आपल्या मुला प्रमाणें बाळगतात तो.

९ श्लो. या. दत्तात्मातुस्वयंदत्तः) स्वयं दत्त ह्मणजे जो आपणच होऊन मी तुमचा मुलगा होतों, ह्मणोन घरांत जो राहतो तो.

१० श्लो. या. गर्भेविन्नःसहोढजः) सहोढज ह्मणजे जी कन्या गरोदर असतां तिचेशीं लग्न लाविल्या नंतर तिला जो पुत्र होतो तो.

११. श्लो. या. उत्सृष्टोगृह्यतेयस्तुसोपविद्धोभवेत्सुतः) अपविद्ध,

ज्या पुत्रास आई बापानीं सोडून दिल्या कारणाने चुकारू सांपडतो तो. या प्रमाणें औरस अनौरस पुत्र आपापल्या आई बाप भाऊ इत्यादिकांचे दाय घेणारे होतात असें सांगीतलें आहे.

श्लोक. स्मृतिः

दत्तौरसेतरेषांतुपुत्रत्वेनपरिग्रहइतिकलिवर्जेषुपाठादिति उक्तेपिशूद्रजातौपौनर्भवस्यापिग्रहणसंभवा दत्तौरससमत्वं पौनर्भवस्यापिसंभवति ॥ ५ ॥

दत्तक आणि औरस या पुत्रा खेरीज इतर पुत्रांस कली मध्यें निषेधिलें आहे, ह्मणून त्यांस पुत्रप्रमाणें मानूंनये असें ह्या स्मृतिकारानें सांगितलें आहे. परंतु निषिद्ध पुत्रा पैकीं, पौनर्भव ह्मणजे पाटाच्या स्त्रीचा मुलास शूद्र जाती मध्यें पुत्रा प्रमाणें मानण्याची चाल असल्या कारणानें जन रूढी किंवा ज्या ज्ञातींत जी चाल असेल त्या प्रमाणें वागावें असेंही शास्त्रांत अनेक ठिकाणीं सांगींतलें आहे ह्मणून ब्राह्मणादि चारी वर्णांत दत्तक औरस या पुत्रास कायम ठेऊन ब्राह्मण क्षत्रिय वैश्य या वर्णा खेरीज इतरजेशूद्रादिक यामध्यें पौनर्भवा सहवर्तमान तीन पुत्रही शास्त्र व जनरूढीनें कायम केले आहेत. या करितां या त्रिवर्गांस कोण कोणत्या रीतीनें विभाग मिळावा हें अनुक्रमानें सांगतों:—

श्लोक. याज्ञव.

अधुना वर्ण्यतेदायविभागोयोगमूर्तिना. ६

दायविभागह्मणजेकाय?

ज्या धनावर ज्या मनुष्यांची मालकी ज्या प्रमाणें असते त्याच प्रमाणें वारस. नात्यानें दुसऱ्या मनुष्याची मालकी ज्या धनावर पोंचतें, त्या धनास दाय असें ह्मणोन त्या धनाच्या विभाग होणें त्यास दायविभाग असें ह्मणावें.

पंक्ति विज्ञानेश्व.

सचद्विविधः सप्रतिबंधोअप्रतिबंधश्चेतितत्रपुत्राणांपौत्राणांचपुत्रत्वेनपौत्रत्वेनचपितृधनंपैतामहधनंपित्र्यभ्रात्रादीनांतुपुत्राभावे स्वाम्यभावेचसंभवतीतिपुत्रसद्भावःस्वामिसद्भावश्चप्रतिबंधकः ७

दाय किती प्रकारचे आहेत?

अप्रतिबंध व सप्रति बंध असे दोन प्रकारचे दाय असून त्यांत अप्रति

बंधदाय ह्मणजे लेंकाच्या नात्यानें बापाच्या धनावर व नातवाच्या नात्यानें आ ज्याचे धनावर जी मालकी पोंचते त्या धनास अप्रतिबंधदाय असें ह्मणावें. स प्रतिबंधदाय ह्मणजे चुलता, भाऊ त्याचे पुत्र, व नातु वगैरे जे वंशज असतां ततेआप आपले धनास मालक आहेत ह्मणून चुलत्याचे धनावर पुतण्याची म लकी त्याचे पुत्र, प्रपौत्रादिक असतील तों परियंत पोंचत नाहीं. तसेंच भाउ किंवा त्यांचे पुत्र पौत्र, इत्यादिक जिवंत आहेत तों पर्यंत एका भावाची मालकी दुसऱ्या भावाच्या धनावर पोंचत नाहीं. कारण हे जों पावेतों जिवंत आहे तों पावतो ज्याचें धन असेल त्याचीच मालकी त्यावर आहे, अर्थात चुल ता व भाऊ जिवंत असणें हायेक प्रतिबंध, तसेच त्याचे पुत्र पौत्रादिक असतील तर तोएक प्रतिबंध, असे अनेक प्रतिबंध आहेत ह्मणून त्या धनास सप्रतिबंधदाय असें ह्मणावें.

पंक्तिः मिताक्षरा.

किंविभागात्स्वत्वमुतस्वत्वस्यविभागइति.

वरील कलमांत सप्रतिबंध व अप्रतिबंध दायां बद्दल उपपादन केलें आतां दायाचा विभाग करण्या पूर्वी दायांवर स्वत्व कोणत्या रीतीनें उ त्पन्न होते, व बापाच्या पोटीं लेंकानें जन्म घेतल्यानेंच बापाच्या जिनगीवर लें काची मालकी उत्पन्न होते; किंवा बापा पासोन लेंकानें विभाग घेतल्या नंत र त्या धनावर पुत्राची मालकी उत्पन्न होते या विषयीं पुढील कलमांत वि च्यार करूं.

मिताक्षरा. पंक्ति.

एकपुत्रःस्यापिपितुःप्रयाणादेवपुत्रस्यस्वत्वमितिनविभाग मपेक्ष्यतइति॥ लोकेचपुत्रादिनांजन्मनैवस्वत्वंप्रसिद्धतरं नापन्हवमर्हति॥

बापाचे पोटीं पुत्रानें जन्म घेतल्यानेंच पुत्राची मालकी बापाच्या जिनगीव र बाप लेंक यांची समान होते असें ह्मणणें जगप्रसिद्ध असोन युक्त आ हे; कारण जर बाप विभाग न करतां मृत होईल तर बापाचे परोक्ष त्या ज्या जिनगीस पुत्रच मालक होतात याजकरितां विभागा पासून स्वत्व उत्पन्न होते, हें ह्मणणें युक्त नाहीं, हें सिद्ध आहे.

विभागश्चबहुस्वामिकधनविषयः प्रसिद्धोनान्यदी
य्यविषयोनप्रहीणविषयः १०

वरील ९वे कलमांत जन्म घेतल्यानेंच मालकी उत्पन्न होते असें जें प्रति पादन केलें आहे, त्याजवरून पाहतां विभाग करावा, या वचनास बाध येत असोन विभाग करण्याची संधी ही राहात नाहीं. अर्थात विभाग करावा या वचनाचा उपयोग कधीं घडणार तर जन्मतः स्वत्व उत्पन्न होतें असें जें वचन आहे तें व्यापक आहे. प्रसेकांच्या स्वत्वा विषयीं दाखवीत नाहीं ह्मणोन अनेक स्वामीक धनाच्या ठिकाणीं विभाग व्हावा हा या वचनाचा उपयोगआहे.

विज्ञानेश्वरपंक्ति

पितुरावश्यकेषुधर्मकृत्येषुवाचनिकेषुप्रसाददानकुटुंबभर-
णार्यद्विमोक्षादिषुद्रव्यविनियोगेस्वातंत्र्यंपिपितकेपैतामहेद्र
व्येजन्मनैवस्वत्वंसिद्धः ११

पुत्र अज्ञान असतां प्रीतिदान, कुटुंब पोषण बंदिखान्यांतून मुक्तक रणें, ज्यांत कर्म, चौल, मुंज्य, लग्न, स्वस्त्रीस स्त्रीधन देणें अशीं जीं अव श्य कृत्यें व धर्म कृत्यें अवश्य करणें आहेत तीं ज्याची सत्ता ज्या धनाव र आहे त्याच्या आज्ञे शिवाय होनात ह्मणोन जन्मतः स्वत्व आहे हें म्हण णें अयुक्त आहे अशीं कितीएक ऋषींचीं मतें आहेत; परंतु ग्रंथाचा पू र्वापार संबध पाहिला असतां व्यर्थ आहेत असें स्पष्ट होतें. कारण अवश्य कर्तव्य कार्य करण्या विषयीं शास्त्रानेंच आज्ञा दिली आहे. तस्माच्छास्त्र प्रमाणंतेकार्याकार्यव्यवस्थितौ) तस्मात् लेंकाचें स्वत्व जन्मतः आजाच्या व बापाच्या धनाव र पोंचतें अर्थात लेंक, बाप, आजा इत्यादिकांचीं मालकी समानच आहे तेव्हां पुत्राची ही आज्ञा घेतलीच आहे असें शास्त्रावरून उघड होतें ह्मणून पुत्राचें स्वत्व आहे अ सा जो शास्त्राचा सिद्धांत आहे तो सयुक्तिक आहे.

पं. वा. विज्ञानेश्वर.

अप्राप्तव्यवहारेषुपुत्रेषुपौत्रेषुवाज्ञुज्ञानादावसमर्थेषुभ्रातृषुवा
तथाविधेषुअविभक्तेष्वपिसकलंकुटुंबेव्यापिन्यामापदितत्
पोषणायावश्यकर्तव्येषुपितृश्राद्धादिषुस्थावरस्यदानाध-
नविक्रयः कोपिसमर्थःकुर्यात् ॥१२॥

वरील १२वे कलमा विषयीं प्रसंतरें करून समजूत करितोः—पुत्र, पौत्र

व बंधू हे सर्व अविभक्त असून त्या पैकीं कांहीं बंधू देशांतरास किंवा तीर्थया त्रेस गेले असतील अगर प्रतिबंधांत असून त्यांच्या स्त्रिया पुत्र व कन्या अ शीं अनेक मनुष्यें एका बंधू जवळ असून त्या पुत्र व कन्यांचें लग्न व मुंजी, कु टुंब पोषण श्राद्ध पक्ष वगैरे कार्य करण्यास, बंदिखान्यांत जर एखादा बंधू किंवा कुटुंबा पैकीं कोणी पडला असेल, तर त्यास अशा आपत्कालीं मुक्त करण्या विषयीं सर्वांची आज्ञा नसली तरी जो अवशिष्ट असेल त्या स शास्त्राधारें त्याणीं आज्ञा दिल्या प्रमाणें समजून अविभक्त कुटुंबा पै कीं, स्थावर जंगम धनाचें दान करण्याचा, व विक्रय गाहाण वगैरे ठेवण्या चा सदरहू प्रसंगीं त्यास अधिकार आहे. या कारणा शिवाय इतर को णत्याही प्रसंगीं धनाचा व्यय करण्याचा अधिकार नाहीं. असें समजावें.

विज्ञानेश्वर या॰ पं॰

यस्मिन्कालेयेनयथाविभागःकर्तव्यस्तद्दर्शयति॰ १३

विभाग करण्याचे काल किती प्रकार आहेत व विभाग कोणाचे इच्छेनें हो ईल. आणि तो विभाग सम विषम कोण कोणत्या कारणानें होईल या ची व्याख्या.

या॰ पंक्ति.

विभागंचेत्पिताकुर्यादिच्छयाविभजेत्सुतान् १४

पिता विभाग करणारा असेल तर आपल्या इच्छे प्रमाणें त्यानें आपल्या मुलास सम विभाग करून द्यावा. असें पुढें सांगितलें आ हे; परंतु एका पुरुषास अनेक पुत्र असतील त्या प्रसंगीं बापानें आ पल्या इच्छे प्रमाणें एका पुत्रास हजार रुपये, एका पुत्रास पंचवीस रुपये या प्रमाणें विभाग करून दिला असतां, हा विभाग यथाशास्त्र व्हावा असें दिसतें तर असा विभाग न होतां त्याजबद्दल शास्त्रानें जो नियम केला आ हे त्या प्रमाणेंच झाला पाहिजे. याजकरितां खालीं निदान केलें आहे.

स्मृति॰ श्लोक.

द्व्यंशोंप्रतिपद्येतविभजन्नात्मनःपिता १५

बापानें पुत्रादिकांस विभाग करून देतेवेळेस स्वतः संपादन केलेलें स्थाव र जंगमादि जें धन असेल त्यांतून आपण दोन अंश घेऊन बाकी सम विभाग पुत्रांस करून द्यावे.

उदाहरण.

नवरा, बायको, व चार पुत्र असे असतील त्या प्रसंगीं एक रुपयाचा हिस्सा करणें आहे तर त्या एक रुपयाचे सात भाग करून त्यांतील दोन भाग बापानें आपण संपादन केल्या बद्दल घेऊन बाकी द्रव्य मुलास व बायकोस समान वांटून द्यावें.

श्लोक याज्ञ.

ज्येष्ठंवाश्रेष्ठभागेनसर्वेवास्युःसमांशिनः

जेष्ठ पुत्रास श्रेष्ठ भाग, मध्यम पुत्रास, मध्यम भाग; कनिष्ठ पुत्रास, कनिष्ठ भाग अशा अनुक्रमानें किंवा सर्वांस सारखेही भाग करून द्यावे.

जेष्ठ पुत्रास श्रेष्ठ भाग असें अनुक्रमानें विभाग देण्या विषयीं सांगितलें आहे. तर श्रेष्ठ भाग ह्मणजे काय व किती प्रकारचा आहे याचें निराकरण करितों.

श्लोक मनुः

ज्येष्ठस्यविंशउद्धारःसर्वद्व्याच्चयद्वरम्॥

ततोर्धंमध्यमस्यस्यात्तुरीयंतुयवीयसः१७

१ समाईक द्रव्यांतून विसावा अंश ह्मणजे शेंकडा ५ रुपये प्रमाणें देणें किंवा समाईक द्रव्यांतून जी मौल्यवान वस्तु असेल ती देणें असे दोन प्रकारचे ज्येष्ठ भाग आहेत, व याच भागास उद्धारांशही ह्मणतात असें समजावें.

२ मध्यमास मध्यम भाग, ह्मणजे शेंकडा अडीच रुपये तसेच कनिष्ठास कनिष्ठ भाग ह्मणजे शेंकडा सवा रुपया अशा अनुक्रमानें जितके पुत्र असतील तितक्यांस विभाग करून द्यावे.

३ हा जो विषम विभाग सांगितला आहे तो स्व संपादित द्रव्या विषयीं जाणावा. आतां परंपरागत द्रव्य असेल तर त्याजवर पिता पुत्राची मालकी समान आहे ह्मणोन बापाच्या इच्छेनें विषम विभाग होणार नाहीं.

ग्रंथकार.

वरील रकमेंत पिता जिवंत असतां स्वसंपादित धनाचा विभाग मनूनें सांगितल्या प्रमाणें स्व इच्छेनें करण्याचा प्रकार सांगितला आहे; परंतु बापाची इच्छा विभाग करण्या विषयीं नसून पुत्राचेच इच्छेने वडिलोपार्जित

व पित्यानें स्वतः संपादलेलें अशा दोनी धनाचा विभाग होणें तर, कोण को णत्या समयीं कोणकोणत्या रीतीनें व्हावा या विषयीं विचार–

श्लोक• नारद:

अतऊर्ध्वंपितुः पुत्राः विभजेयुर्धनंसमं ॥
मातुर्निवृत्तेरजसिप्रत्तासुभगिनीषुच ॥ नि
वृत्तेचापिरमयोपितुर्युपरतस्पृहे ॥ पितुर
धर्मवर्तिनिदीर्घरोगिणिचेति ॥ १८ ॥

१. पिता जिवंत असतां त्यास प्रजोत्पत्ती होण्याची राहिली अगर पिता उपरत ह्मणजे प्रपंच्य करण्याची इच्छा नसोन विरक्त झाला असेल, बहिणीचें लग्न झालें असेल, किंवा पिता अधर्म वृत्ती असेल, अगर महा रोगग्रस्त झाला असेल, तसेच माता अस्पर्श होण्याची राहिली असेल किंवा अशाच प्रकारचीं अनेक कारणें सयुक्तिक असतील तर पित्याचे इच्छेवां चून पुत्राचेच इच्छेनें समान विभाग व्हावा असें आहे.

२. सदरहू विभागाचे काल पिता जिवंत असतां सांगीतले परंतु पिता मृत होईल तर पुत्रांनीं आपल्या इच्छेनें बापाचें व आज्याचें धन समान वां टून घ्यावें, हा एक काल आहे.

ग्रंथकार.

माता सरजस्क असून पिता अधर्म वृत्ती आहे आणि त्याची इच्छा विभा ग करण्या विषयीं नाहीं तर पुत्राच्या इच्छेनें विभाग व्हावा हा येक काल.

बाप जिवंत किंवा मृत असतां सम आणि विषम असे दोन प्रकारचे विभागांचे काल सांगितले आहेत त्यांत विषम विभाग कोणा कोणत्या रीतीनें कोण कोणास कस कसा द्यावा याज विषयीं पूर्वीं उपपादन केलेंच आहे. पुनश्च बाप जिवंत असतां सम विभाग करण्याचा प्रकार सांगतो:-

श्लोक• याज्ञ•

यदिकुर्यात्समानंशान्पत्न्यःकार्याःसमांशकाः ॥
नदत्तंस्त्रीधनंयासांभर्त्रावाश्वशुरेणवा ॥ १९ ॥

१. ज्या समयीं पिता आपले इच्छेनें पुत्रास सम विभाग करून देतो त्या समयीं आपल्या बायकोस पूर्वी स्वतः पासून, किंवा सासू सासऱ्या क डून कांहीं स्त्रीधन मिळालें नसेल तर पुत्राच्या हिशाबरोबर तिजलाहि

२ पूर्वी स्त्रीधन दिलें असेल तर ते वजा देऊन बाकी पुत्राच्या हिश्शा बरोबर होण्यास जितकें धन पाहिजे असेल तितकें धन देऊन मुलाच्या हिश्शाबरोबर स्त्रीसही हिस्सा द्यावा; स्त्रीधन पुत्राचे हिंशा पेक्षां जास्ती किंवा सम असेल तर स्त्रीस हिस्सा देण्याचें कारण नाहीं.

वाक्य. आपस्तंभः

परिभांडंचगृहेलंकारोभार्यायाइति ॥२०॥

१. जर पिता पुत्रास आपल्या इच्छेनें सम विभाग करून देईल तर त्याज बरोबर स्त्रीस हिस्सा देणें तो सम द्यावा. ह्मणोन पूर्वी सांगितलें आहे आतां पुत्रास ज्येष्ठ विभागादिक वर सांगितल्या प्रमाणें पिता विभाग करून देईल त्या प्रसंगीं स्त्रीस हिस्सा कसा मिळावा हें मुग्ध राहिलें याजकरितां विषम विभागाचे प्रसंगीं ज्येष्ठांश वजा जाऊन बाकी धनाचा समविभाग ज्या प्रमाणें पुत्रास पिता करून देतो त्याच प्रमाणें स्त्रीसही द्यावा पाहिजे.

२. वरील कलमांतील अभिप्राया प्रमाणें स्त्रीस श्रेष्ठांश व उद्धारांश थिवूं नये, असें होतें; परंतु परिभांड ह्मणजे घरांतील भांडी, तसेंच तिणे आपले अंगावर जे अलंकार धारण केले असतील ते मात्र त्या स्त्रीस मिळतील असें समजावें.

श्लोक. याज्ञव.

शक्तस्यानीहमानस्यकिंचिद्दत्वापृथक्क्रिया ॥२१

पूर्वी सम आणि विषम असे दोन प्रकारच्या विभागा विषयीं प्रतिपादन केलें आतां त्या शिवाय भिन्न प्रकारच्या विभागा विषयीं उपपादन करितों.

जो पुत्र किंवा भाऊ स्वतः द्रव्य संपादन करण्या विषयीं समर्थ असल्या मुळें बापाचें वडिलोपार्जित द्रव्य घेऊं इच्छीत नसेल तर त्यास एकंदर धनांतून कांहीं अंश देऊन त्याची फारखत करून घेतली पाहिजे. कारण त्याच्या पुत्र पौत्रादिकांस आपल्या बापाच्या व आज्याच्या धनाचा हिस्सा घेण्याची इच्छा त्यांस कधीं नव्हावी, असा एक विभाग करण्याचा प्रकार सांगितला आहे.

श्लो० या०

विभजेयुस्सुताःपित्रोरूर्ध्वंरिक्थंऋणंसमं ॥२२

आई बाप जिवंत असतां कोण कोणत्या रीतीनें विभाग व्हावा याजब्दल पूर्वीं उपपादन केलें आहे. आतां आई बाप निवर्तल्यावर परंपरागत व पितृसंपादित द्रव्य, तसेंच मातृस्त्रीधन असें अनेक प्रकारचें धन असल्यास त्याचा विभाग केव्हां व कोणी कसा करावा या विषयीं स्पष्ट करणाकरितां:—

आई बाप निवर्तल्या नंतर पुत्रांनीं आईच्या स्त्री धना वांचून बाकी सर्व धनाचा विषम विभाग करावा असें आपस्तंबादिकांचें मत आहे म्हणून मनूनें सांगोन पुनः (मनुःपुत्रेभ्योदायंव्यभजत्) मनूनेंच विषम विभागाचा निषेध करून समच विभाग व्हावा अशा विषयीं कारणें दाखविलीं तीं (अस्वर्ग्यंलोकविद्विष्टंधर्ममप्याचरेन्नतु ॥ महोक्षंवामहाजंवाश्रोत्रियायोपकल्पयेदिति ॥ तथा अनूबंध्यामालभतइत्यादिगवालंभनविधानंलोकविद्विष्टत्वादननुष्ठानंतथायोगधर्मोद्धारविभागोपिनैवकलौसंप्रवर्ततइति) अनुक्रमानें सांगतों—

१ धर्म असून जो लोक विरुद्ध व त्या पासून स्वर्गप्राप्तीही नाहीं, असे जे अनेक धर्म त्यांत नियोग धर्म म्हणजे जेष्ठ भावाची स्त्री निपुत्रिक असून तिचा पती मृत असेल तर मृताच्या कनिष्ठ बंधू पासून प्रजोत्पत्ती करून घ्यावी.) तसेंच अनुबंध्या (म्हणजे कोणी महा सत्पुरुष, किंवा अतिथी घरीं आला असतां त्याच्या भोजना करितां गोवध करावा.) श्रोत्रिय म्हणजे वेदशास्त्र संपन्न असून श्रौतस्मार्त कर्म करणारा घरीं आला असतां त्याजकरितां मोठा बलाढ्य बैल, किंवा बोकड त्यास अर्पण करावा. असे स्मृतीनें अनेक प्रकारचे धर्म सांगितले असून ते लोकरूढीस विरुद्ध आणि कली मध्यें निंद्य म्हणोन इतर शास्त्रांतही सांगीतलें आहे. त्याच प्रमाणें विषम व उद्धारविभागही कलीमध्यें वर्ज केला आहे. याजकरितां विषम विभाग न होतां पुत्रांनीं समविभाग करावा हें योग्य आहे.

२ वरील रकमेंत सम विभाग करण्या विषयीं उपपादन केलें आहे. परंतु आई बाप हे जिवंत असते समयीं धर्मकार्य, व उपजीविका, व विपत्ति निवारण करण्या करितां जें कर्ज झालें असेल तें आई बाप हे न फेडतां मृत होतील तर, त्या वेळेस विभाग करण्याची संधी आली असेल त्या प्रसंगीं पुत्रांनीं आई बापाचें कर्ज व धन हे दोनी सम समान वांटून घ्यावें.

श्लो. या. व.

मातुर्दुहितरःशेषमृणात्ताभ्यऋतेन्वयः॥२३॥

मागील कलमांत स्त्रीधना वांचून वडिलोपार्जित धनाचा आईबापाचे पश्चात पुत्रांनीं विभाग करून घ्यावा, असें कथन केलें आहे; परंतु आईस कर्ज असून तिचें स्त्री धनही असेल त्या प्रसंगीं तें स्त्रीधन पुत्रांनीं घेऊन रिणादान प्रकर्णांत सांगितल्या रीतीचें कर्ज असेल तर तें आईचे स्त्री धनां तून फेडावे. जर स्त्रीधन कमी असून ऋण ज्यास्त असेल तरीही पुत्रानें धनें घेऊन कर्ज फेडावें. आईचें स्त्रीधन ऋण फिटून जास्त असेल तर कर्ज फेडून बाकी जें राहील तें कन्येस ह्मणजे बहिणीस वांटून द्यावें. कन्येस आईचें ऋण फेडण्याचा अधिकार शास्त्रांत सांगीतला नाहीं; ह्मणून ऋण फिटून जर जास्त उरेल तरच आईचें स्त्रीधन कन्येस घेण्याचा अधिकार पोंचतो, इतर प्रसंगीं पोंचत नाहीं.

श्लोक. स्मृतिः

पुमा पुंसोधिकेशुक्रेस्त्रीभवत्यधिकेस्त्रियः २४.

मातृधन पुत्राकडे न जातां कन्येकडेसच जावें, तसेंच पित्याचें धन कन्येकडेस न जातां पुत्राकडेसच जावें याचें कारण काय याज बद्दल शंका घेऊन निवारण करितो:-

पुरुषाचें वीर्य अधिक असल्यास पुत्र होतो, आणि स्त्रीचें शुक्र अधिक असल्यास कन्या होते यास्तव कन्येचे गर्यी स्त्रीचे अवयव अधिक असता न म्हणून स्त्रीधन कन्येकडे जातें. व पुत्राचे गर्यी पित्याचे अवयव अधिक आहेत ह्मणोन पित्याचें धन पुत्राकडे जातें, असा सिद्धांत आहे.

श्लोक. गौतमः

स्त्रीधनंदुहितॄणांअप्रत्तानांअप्रतिष्ठितानांचेति २५.

स्त्रीधन कोणत्या प्रसंगीं कोणत्या कन्येस कसें द्यावें याजबद्दल उपपादन करितो:-

एक कन्या विवाहित, दुसरी अविवाहित, तिसरी विवाहित निर्धन, चौथी विवाहित सधन अशा चौघी असतील त्या प्रसंगीं मुख्यत्वें करून अविवाहित कन्या असतील त्यांस तें स्त्रीधन द्यावें. जर तें तसें नसोन विवाहित निर्धन असतील तर त्यांस द्यावें, त्याही नसून विवाहित सधन अ

सतील तर त्यास द्यावें, चौथी विवाहित, किंवा चौथी अविवाहित किंवा चौथी विवाहित सधन, किंवा चौथी विवाहित निर्धन अशा असतील तर पूर्वींच्या अनुक्रमानें समान विभाग सर्व कन्यास द्यावे.

श्लोक-या.

ताभ्यःऋतेन्वयः २६

पूर्वी आईचें कर्ज फिरण्या इतकें किंवा त्याहून कमी स्त्रीधन असेल तर तें धन, तसेंच कर्ज फिटून ज्यास राहिलें असल्यास तें धन कोणी कसें घ्यावें याज बद्दल उपपादन केलें आहे; परंतु कर्ज फिटून ज्यास स्त्रीधन असून ज्या स्त्रीस, कन्या नसतील त्या प्रसंगीं अनंश प्रकरणीं ज्या पुत्रास क्लीबादिक वगैरेस अंश न घेण्या विषयीं दोष सांगितले आहेत तसे दोष युक्त ते पुत्र नसतील तर त्यांणीं आपल्या आईचें स्त्रीधन घ्यावें. दोषयुक्त असतील तर त्या शिवाय जे इतर वारस असतील त्यांणीं घ्यावें.

श्लोक-याज्ञ.

पितृद्रव्याविरोधेनयदन्यत्स्वयमर्जितम्॥
मैत्रमौद्वाहिकंचैवदायादानंनतद्भवेत् २७॥

अविभाज्य धनाचें विवरण.

अविभाज्य धन म्हणजे एकंदर धना पैकीं कांहीं धनाचा अंशरूपानें विभाग व्हावा. व काहीं धनाचा मुळींच विभाग होऊं नये याजबद्दल व्याख्या.

जें स्वतः संपादिलें असेल, व जें मित्रा पासून प्राप्त झालें, लग्नाचे वेळेस प्राप्त झालें, अशा प्रकारचें द्रव्य जर आई बापाच्या धनाचा खर्च न करितां मिळालें असेल तर तें धन भाऊबंदास न देतां मिळविणारानेंच घ्यावें.

श्लोक-याज्ञ.

क्रमादभ्यागतंद्रव्यंहृतमप्युद्धरेत्तुयः॥दाया
देभ्योनतद्दद्यात् २८

१ परंपरागत द्रव्य २ सरकारांत राहिलें अथवा जप्त झालें, किंवा दुसऱ्यांनीं हरण केलें) पित्रा इत्यादिकांस सामर्थ्य नसल्या मुळें हस्तगत झालें नाहीं असें द्रव्य पुत्रांतून कोणी एकानें इतर बंधूंची आज्ञा घेऊन किंवा बिना घेतां आई बापाच्या द्रव्याचा व्यय न करितां हस्तगत करून घेईल तर तें बापुत्रांनीं विभाग इतर वारसास न देतां संपादन करणारानेंच घ्यावा.

२. परंतु वरील रकमेंत लिहिलेले द्रव्य जर स्थावर असेल तर हस्त गत करून घेणारानें त्या एकंदर स्थावर धनांतून चतुर्थांश संपादन करण्या बद्दल घेऊन बाकी जें राहील तें आपल्या सकट समविभाग करून आपला हिस्सा आपण घेऊन बाकी समविभाग इतर बंधूंस द्यावा.

श्लो· याज्ञवल्क्यः

विद्ययालब्धमेवच ॥२९॥

१. आई बापाच्या द्रव्याचा व्यय न होतां वेदाध्ययन, किंवा वेद पढवि णें; अथवा वेदार्थ सांगणें या पासून मिळविलेलें जें द्रव्य तें वारसास देऊं नये. ज्यानें संपादन केलें त्याचेंच तें सर्व द्रव्य आहे असें समजावें.

२ आई बापाचे द्रव्याचा व्यय करून वरील रकमेंत सांगितलेलें द्र व्य संपादन केलें असेल तर मिळविणारास मेहेनती बद्दल कांहीं न दे तां दाया प्रमाणें समान विभाग व्हावा.

श्लोक· नारदः

कुटुंबंबिभृयाद्भ्रातुर्योविद्यामधिगच्छतः

भागंदद्याद्धनात्तस्मात्सलभेताश्रुतोपिसन् ३०

विद्याध्ययनें करणाऱ्या भावाचें कुटुंब पोषण जो भाऊ करितो तो वि द्याहीन असोन त्या दोघांची कबुलायत झाली नसेल तरी विद्याधनाचा वि भाग त्या भावास दिला पाहिजे.

श्लोक· मनुः

अनुपघ्नन्पितृद्रव्यंश्रमेणयदुपार्जयेत् ॥

दायादेभ्योनतद्द्यात् ॥ ३१ ॥

आई बापाचे द्रव्याचा खर्च नकरितां स्वकष्टानें म्हणजे सेवा किंवा युद्धा दिकें करून जें द्रव्य (स्थावरजंगम) संपादन केलें असेल त्या धनाचा विभा ग आई, बाप, भाऊ, बंद इत्यादिकांस न देतां स्वतः मिळविणारानेंच घ्यावा.

श्लोक· कात्या०

परभक्तोपयोगेनविद्याप्राप्तान्यतस्तुया ॥ तया

लब्धंधनंयत्तुविद्याप्राप्तंतदुच्यते ॥ ३२ ॥

आई बापाच्या द्रव्याचा व्यय नकरितां लोकांचे घरीं किंवा देशांतरीं गमन करून तेथेंच भोजन वगैरे करून जी दुसऱ्या पासून विद्या व शौर्य संपाद

नळ, विहिरी, तलाव, ९ उदकं उदकाधारः कूपादिः तच्चविषम्स्यद्वारेणानविभाज्यंपर्यायेणभोक्तव्यमितिमिताक्षरायां । वर सदासी इत्यादिक अनेक असतील तर सर्वांनीं समान घ्यावें. जर एक एक असेल तर त्याची किंमत न ठरवितां पाळी पाळी प्रमाणें उपभोग करावा.

मयूखपंक्ती.

स्त्रीषुसंसक्तास्वविभागइतिगौतमोक्तेः ३८

बापानें एक किंवा अनेक राखलेल्या स्त्रिया असतील तर त्यांचा विभाग न करितां सर्व दायादानीं त्या स्त्रियांस अन्न वस्त्र देऊन पोषण करावें.

बृहस्पतिः

कृतान्नंचाकृतान्नेनपरिवर्त्यविभज्यते ३९.

सिद्धभक्ष पदार्थ ह्मणजे शिजलेलें अन्न असेल तर त्याचा विभाग न होतां सर्व दायादांनी मिळून भोजन करावें; परंतु ज्याची इच्छा भोजन करण्याची नसेल त्यास अन्नाचे मोबदला धान्य द्यावें.

मयूखपंक्ति.

इष्टंयागविप्रभोजनादितदर्थमविभागदशायांसर्वानुमत्यायद्रव्यंयेनोत्सृज्यपृथक्स्थापितंतेनद्रव्येणसधर्मस्तेनैवकार्यः॥धर्मवास्तुगोप्रचारक्षेत्रादिनविभाज्यम् ४०

धर्मशाळा, देवालय, नदीचा घाट इत्यादिक बांधण्या बद्दल, व ब्राह्मणभोजन करण्या बद्दल वडिलांनीं किंवा अविभक्त कुटुंबा पैकीं कोणी येकानें सर्वाईक द्रव्यांतून संकल्प करून कांहीं द्रव्य ठेविलें असेल तर त्या द्रव्याचा विभाग न होतां ज्याणें संकल्प केला असेल त्याणेंच त्या कामाकडे त्याचा खर्च करावा. धर्मशाळा असेल तर त्याचा हिस्सा होऊं नये.

तसेच गाई चारण्या बद्दल धर्मार्थ जमीन सोडली असेल तर त्याचा विभाग करूं नये.

मयूखपंक्ति.

योगक्षेमशब्देनमंत्रिपुरोहितादयउच्यंतेइतिकल्पतरौ प्रचारोगृहारामादिमार्गः॥ [illegible]

मंत्री, पुरोहितपणा, व शेतास, बागास, पाण्यास, देवालयास, घरास जाण्या चे रस्ते इत्यादिकांचा विभाग एथक न करितां सर्व दायादांनीं समाईक व हिवार करावी.

आसन ह्मणंजे ज्या सिंहासनावर बसोन जो राज्य करितो त्या सिंहासनाचा विभाग होऊं नये.

श्लोक. याज्ञ.

सामान्यार्थसमुत्थानेविभागस्तुसमस्मृतः ५२

अविभक्त बंधूंतून कोणी एकानें जरी समाईक धनांतून सावकारी वगैरे करून धन मिळविलें तरी सर्वांस समान विभाग मिळावा. संपादन करणारास अधिक अंश मिळूं नये.

श्लोक. याज्ञ.

अनेकपितृकाणांतुपितृतोभागकल्पना ५३

आज्याच्या द्रव्यावर पुत्राची व नातवाची मालकी जन्म घेतल्यानेंच समान आहे ह्मणोन त्या द्रव्याचा विभागही समानच प्राप्त झाला याज करितां आज्याचे द्रव्याचा विभाग नातवांनीं करणें तो पित्याचे द्वारें करावा.

व्याख्या— चौघे बंधू अविभक्त असून त्यांतून एकास एक, दुसऱ्यास दोघे, व तिसऱ्यास तिघे, किंवा पांच असे पुत्र असून त्या पैकीं एक किंवा त्याहुन अधिक अविभक्त बंधू मृत होतील तर त्यांच्या पुत्रास जसा आप आपल्या बापाचा हिस्सा घेण्याचा अधिकार पोंचतो त्याच प्रमाणें नातवास आपल्या आज्याच्या द्रव्याचा हिस्सा आप आपल्या बापाच्या द्वारानें बापाचा हिस्सा घेण्याचा अधिकार पोंचेल. आपल्या द्वारें पोंचत नाहीं.

उदाहरण.

अ यास- ब, क, ड, असे तिघे पुत्र असून अ या सहवर्तमान ब, क, ड, हे अविभक्त असतां त्या पैकीं ब यास ख व ग असे दोघे पुत्र होऊन ब हा मृत्यु झाला, व ड यास भ या नावाचा एक पुत्र होऊन ड हा मृत्यु किंवा वेडा आहे. नंतर कांहीं दिवसानीं विभागाची संधी आली, असे ख, ग, भ, यांनीं क यास मिळून किंवा न मिळतां अ याजपासून पितो ख, ग, भ, यांनीं क यास मिळून किंवान मिळतां अ याजपासून पि

भाग घेणें तर ब व ड ज्या प्रमाणें घेतेत त्या प्रमाणें ख ग व भ यांनीं भाग घेणें तर ब व ड ज्या प्रमाणें घेतेत त्या प्रमाणें ख ग व भ यांनीं

[illegible] त्यास आपल्या द्वारें— पृथक् पृथक् विभाग मा-

गण्याचा अधिकार नाहीं असें समजावें.

श्लोक. बृहस्प०

सवर्णाभिन्नसंख्यायेपुंभागस्तेषुशस्यते ५४

अ या नावाचे मनुष्यास ब, क, ड, अशा तिघी लग्नाचा बायका असून त्यांत ब इजला ग, घ, असे दोन पुत्र आहेत. व क इजला च, छ, झ, असे तिघे पुत्र आहेत व ड इजला प, फ, ब, भ, म, असे पांच पुत्र आहेत. अ या मनुष्या जवळ स्वतः संपादित व वडिलोपार्जित अशी एकंदर तीन हजारांची इस्टेट असून वरील एकंदर पुत्र अज्ञान असल्यानें तिघी बायकांच्या द्वारें विभाग करून दर एकीस हजार हजार रुपये प्रमाणें समविभाग करून देऊन अ हा मयत होईल किंवा जिवंत असेल तरी एकंदर पुत्र सज्ञान झाल्यावर वरील जिनगीचा वडिलानें अशास्त्र विभाग करून दिला. याजकरितां ती जिनगी अविभक्त समजून वरील सर्व पुत्रांनीं पुनश्च समान विभागून घ्यावी. कारण अशा प्रसंगीं बापानें आईच्याद्वारें पुत्रास जो विभाग करून दिला, हा अशास्त्र आहे.

श्लोक. याज्ञ०

भूर्यापितामहोपात्तानिबंधोद्रव्यमेववा
तत्रस्यात्सदृशंस्वाम्यंपितुःपुत्रस्यचैवहि ५५

आज्याच्या धनाचा हिस्सा नातवास मिळणें तर बापाची अनुमती घेतल्या वांचूनही मिळावा. कारण ज्याणें जें धन संपादन केलें त्याज पासून जर हिस्सा घेणें तरमात्र त्याची अनुमती अवश्य घेतलीच पाहिजे. वडिलोपार्जित धनाचा हिस्सा घेण्या विषयीं संपादन करणाऱ्या शिवाय इतरांच्या अनुमतीची गरज नाहीं. ह्मणोन आज्यानें संपादलेली जमीन व निबंध म्हणजे फसकी एका पान वाल्यास अमुक पानें, किंवा गोणीभर वांग्यांस अमुक वांगी, अमुक फुलांचे ओझ्यास अमुक फुलें व धन इत्यादिक द्रव्य आज्यानें मिळविलेलें असेल तरी त्याजवर पुत्राची व नातवाची मालकी समान आहे ह्मणोन लेकाच्या अनुमती वांचून नातवास विभाग मिळावा हें युक्त आहे.

वाक्य. विज्ञानेश्वर.

तथाअविभक्तेनपित्रापैतामहद्रव्येदीयमानेविक्रियमाणेवापौत्रस्य

पुत्रस्वत्वस्यसत्वात्पुत्रानुमतिरप्यपेक्षिता॥ ४६

पिता अविभक्त असतां वडिलोपार्जित द्रव्य कोणास बक्षीस देईल किंवा विकून टाकील तर त्याचा निषेध करण्या विषयीं पुत्रादिकांस अधिकार आहे.

(पहा क. ९.)) पित्यानें स्वतः संपादन केलेल्या द्रव्या विषयीं मात्र निषेध करण्याचा पुत्रास अधिकार नाहीं; परंतु पित्यानें पुत्राची अनुमती घेतलीच पाहिजे. कारण पुढें विक्री वगैरे बद्दल तक्रार न पडावी.

श्लोक-मनुः

पैतृकंतुपिताद्रव्यमनवाप्तमवाप्नुयात्॥ नतत्पुत्रैर्भजेत्सार्द्धमकामःस्वयमर्जितम्. ४७

आज्यानें मिळविलेल्या द्रव्याचा कोणी अपहार केला असेल आणि आज्याकडून तें हस्तगत न झालेलें द्रव्य जर बाप हस्तगत करून घेईल तर तें धन बापानें स्वतः संपादलेल्या धना प्रमाणें समजून त्याचा विभाग होणें तो बापाची इच्छा असेल त्या वेळेसच द्यावा. येथें हें धन वडिलोपार्जित असेल तरी इतरांच्या इच्छेनें विभाग होणार नाहीं.

श्लोक-याज्ञ०

विभक्तेषुसुतोजातःसवर्णायांसदायभाक्. ४८

विभाग झाल्यावर पुत्र होतील तर त्यांस हिस्सा कसा मिळावा याज बद्दल :-

पुत्र व बापकीं यांसहवर्तमान वडिलोपार्जित स्वसंपादित द्रव्याचा विभाग बापानें करून घेतल्या नंतर कांहीं दिवसांनीं विभाग करणाऱ्या पुरुषास पुनः पुत्र होतील तर विभक्त झाल्यावर जें धन बापास मिळालें असेल तें धन, व विभागांत जें आलें असेल तें धन हीं दोनी धनें विभागा नंतर झाले त्या पुत्रास द्यावीं.

श्लोक-मनुः

ऊर्ध्वंविभागाज्जातस्तुपित्र्यमेवहरेद्धनं॥

अनीशाःपूर्वजाःपित्रोर्भ्रातृभागेविभक्तजः ४९

विभक्त झाल्या नंतर जो पुत्र होईल त्याणेंमात्र विभक्त आई बापाचें धन घ्यावें. कारण-प्रथमतः विभक्त झालेले पुत्राचें धन विभागा नंतर झालेले पुत्रास. तसेंच नवीन झालेले पुत्राचें धन प्रथमतः विभक्त झालेल्या पुत्राम

नीने विवाहादिक करावें असें सांगितल्या वरून कन्या देखील पित्याच्याप श्चात विभागाच्या अधिकारी होतात, असें समजलें पाहिजे.

एका पुरुषास पुत्र व कन्या असे आहेत तर सर्व द्रव्याचे दोन विभाग करून त्यांतील एका भागाचा चतुर्थांश कन्येस द्यावा. बाकी एक भाग आणि तीन चतुर्थांश पुत्रांनीं घ्यावे. जर दोन पुत्र व एक कन्या आहे तर सगळ्या पितृधनाचे तीन भाग करून त्यांतील एका विभागाचा चतुर्थांश कन्येस देऊन बाकी दोन विभाग आणि तीन चतुर्थांश दोघां पुत्रांनीं वांटून घ्यावे. जर एक पुत्र आणि दोन कन्या अशा असतील तर सर्व धनाचे तीन हिस्से करून, त्यांतील एका हिश्शाचे चार वांटे करून, दोन वांटे दोघी कन्यांस देऊन बाकी दोन भाग आणि दोन चतुर्थांश पुत्रांनीं घ्यावें. याप्रमाणें भाऊ व बहिणी यांज विषयीं विषम विभागाची योजना करावी. याच प्रमाणें मनूचेंही मत आहे, ह्मणोन तेंही लिहिलें आहे.

श्लोक. मनुः

स्वेभ्योंऽशेभ्यस्तुकन्याभ्यः प्रदद्युर्भ्रातरः पृथक्
स्वस्मादंशाच्चतुर्भागंपतितास्स्युरदित्सवः ५६

भावानी असंस्कृत भगिनीचे विवाह समाईक द्रव्यांतून केले म्हणजे तिजला वरील कलमांत सांगितल्या प्रमाणें चतुर्थांश हिस्सा देण्याचें कारण नाहीं, असें कितीएकग्रंथकारांचेंमतआहे परंतु त्या मता प्रमाणें करावें तर (याज्ञवल्क्यमनुः मेधा तिथी) इत्यादिक ऋषींच्या वचनांस बाध येतो– कारण या वचनांत असें सांगितलें आहे कीं, समाईक द्रव्यांतून असंस्कृत भगिनीचे संस्कार करून त्यांस व संस्कृत ह्मणजे लग्न झालेल्या अशा उभयतांस बंधू विभाग न देतील तर ते पतीत म्हणजे दोषयुक्त होतील. याजकरितां भगिनीस हिस्सा दिला पाहिजे.

श्लोक याज्ञवल्क्यः

अन्योन्यापहृतंद्रव्यंविभक्तेयत्तुदृश्यते.
तत्पुनस्तेः समैरंशैर्विभजेरन्नितिस्थितिः ५७

सर्व धनाचा विभाग होऊन त्या पैकीं कांहीं अंश नकळतां राहिला असेल तर त्याचा विभाग कसा करावा याजविषयीं सांगतों:–

परस्परांनीं गुप्तपणें अपहार केलेलें समाईक द्रव्य विभाग झाल्या

समजण्यांत न येतां पितृधनाचा विभाग झाला. नंतर कांहीं काळानें तें समजण्यांत येईल तर त्या द्रव्याचा विभाग समान व्हावा. कारण-श्लोकां त सम विभाग व्हावा असें शुद्दाम सांगितल्यानेंच उद्धार विभागाचा निषेध झाला. आणि वांटून घ्यावें असें सांगितल्यावरून ज्यानें उघाडीस आणि लें असेल, त्या एकल्यानेंच घेऊं नये असेंही दाखविलें, या प्रमाणें याचच नाचें सार्थक झालें ह्मणोन समाईक द्रव्यांतून कांहीं अपहार केला असेल तर त्याजला अपहार केल्या बद्दल दोष येतो असें समजावें.

श्लोक. मनुः

योज्येष्ठोविनिकुर्वीतलोभाद्भ्रातृन्यवीयसः
सोऽज्येष्ठस्यादभागश्चनियंतव्यश्चराजभिः ५८

समाईक द्रव्यांतून ज्येष्ठभावांनीं कांहीं द्रव्याचा अपहार केला असेल तर हिस्सा नदेतां अपहार केल्या बद्दल त्यास राजानें शिक्षा करावी, असें मनूनें सांगितलें आहे; याजवरून कनिष्ठ किंवा मध्यम भावांनीं समाईक द्रव्यांतून अपहार केल्यास त्यास चोरी केल्या बद्दल कांहीं शिक्षा होऊंनये. अशीं किती एकांचीं मतें आहेत; परंतु तीं सयुक्तिक नाहींत. कारण ज्येष्ठ भावास इतर सर्व भावांनीआपल्या पित्या प्रमाणेंच मानावें असें शास्त्रांत किती एक ठिकाणीं सांगितलें असून जर त्याणें अपहार केला असतां दोष सांगतात तर कनिष्ठ अथवा मध्यम बंधू यांतून कोणी अपहार केला असतां त्यास दोष आहे किंवा नाहीं याजविषयीं संशय घेण्याचें प्रयोजन नाहीं. कारण जेथें आपल्याहून श्रेष्ठास दोष सांगितला तेथें कनिष्ठासही दोष अर्थ सिद्धच आहे. याजकरितां समाईक द्रव्यांतून कोणीही एकमेकास न विचारितां द्रव्यावर आपली मालकी आहे ह्मणोन अपहार करूं नये. कारण जो कोणी ज्येष्ठादिकांस वंचना करावी म्हणोन अपहार करितो त्यास इतर बंधू,पुत्र,पौत्र, इत्यादिक अपहार करणारास श्राप देऊन नाश करितात असें शास्त्रांत सांगितलें आहे.

श्लोक. मनुः

नान्यस्मिन्विधवानारीनियोक्तव्याद्विजातिभिः॥ अन्यस्मिन्हिनियुंजानाधर्महन्युःसनातनम् ॥१॥ अपत्यलोभाया सेहनिंदामवाप्नोतिपरलोकाच्च

हीयतेइतिस्मृतिः ५९

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या जातींतील विधवास्त्रि यांस नियोग म्हणजे नवरा मेल्या नंतर गुरू किंवा आई बाप अथवा सासू सासरे इत्यादिकांनीं दीर किंवा इतर पुरूष यांपासून प्रजोत्पत्ती करून घेण्या विषयीं तिजला आज्ञा देऊं नये. कारण अशी आज्ञा देतील तर तें अधर्म कृत्य केल्या सारखें होऊन धर्माचाही नाश केल्या प्रमाणें होईल.

तसेच, निपुत्रीक विधवा स्त्री, पुत्र व जिनगी यांच्या लोभानें दीर किंवा परपुरुष यांज बरोबर संग करिते तीही अधोगतीस प्राप्त होते. या जकरितां या नियोगाचा कलीमध्यें उपयोग नाहीं ह्मणोन तो सोडून देऊन जो उपयुक्त नियोग तो सांगतों:—

श्लोक. याज्ञ.

यस्याम्रियेतकन्यायावाचासत्येकृतेपतिः
तामनेनविधानेननिजोविंदेतदेवरः ६०

वागदत्त म्हणजे काय?

मी असुक नावाचा, असुक गोत्राचा, असक्याचा मुलगा, नातु, मी माझी असुक नावाची कन्या, असुक नावाच्या, असुक गोत्राच्या, असक्याच्या, मुलास विधिपूर्वक दान करितों; असें देव ब्राह्मण यांच्या सांनिध्य उच्चार करणें यास वागदत्त असें ह्मणतात.

जी कन्या ज्यास वागदत्त झाली, तो मनुष्य कन्यादान घेतल्या वांचून त्या कन्येचा नवरा होतो, असें या वचना वरून होतें; या करितां तो नवरा कन्यादान होण्या पूर्वींच मरण पावला असेल, तर त्याच्या वडील किंवा धाकट्या भावानें तिजबरोबर लग्न करावें, असें वचनांत सांगितलें आहे.

श्लोक. याज्ञ.

यथाविध्यधिगम्यैनांशुक्लवस्त्रांशुचिव्रतां
मिथोभजेताप्रसवात्सकृत्सकृदृतावृतौ ६१

वरील ६० वे कलमांतील वागदत्त स्त्री, शुभ्रवस्त्र धारण करून अंतःकरण व इंद्रिय निग्रह करणारी असल्यास त्या स्त्रीनें वरील सांगितलेले प्रकारच्या नवऱ्यानें घृताभ्यंग व मौन धारण करून दोहोंशी युक्त होऊन गर्भ धारण होई तों पर्यंत प्रत्येक ऋतु १ वेळशी ...

१६ दिवस पर्यंत एकवार एकांतीं संग करावा.

वर सांगितलेल्या वाचनीक विवाह घृताभ्यंगादिक नियमा प्रमाणें हेंही संग करण्याचे अंगभूत आहे, ह्मणोन ती स्त्री दिराचीच होते असें नाहीं, याजकरितां तिचे ठायीं उत्पन्न झालेल्या मुला विषयीं पूर्वीं करार झाला असेल तर दोघांचाही पुत्र होतो. करार झाला नसेल तर तो पुत्र मृताचाच होतो, असें शास्त्रानें नियोग प्रकरणांत सांगितलें आहे, म्हणोन हा पुत्र आपल्या बापाच्या सर्व धनास अवरसा प्रमाणें मालक होतो, हा नियोग शास्त्रानें निषेध केला नाहीं; परंतु सांप्रत लोक रुढी अशी नाहीं म्हणोन याचा विस्तार येथें संक्षेप रीतीनें दाखविला असून लोक रुढी नसेल्या कारणानें त्याजविषयीं खालीं निषेधही सांगितला आहे.

श्लोक स्मृतिः

यच्छास्त्रंलोकविद्विष्टंधर्ममप्याचरेन्नतु ६२

शास्त्रानें जो एखादा धर्म सांगितला असून तो लोक रुढीस विरुद्ध असेल तर त्या प्रमाणें न आचरण करितां या प्रसंगीं लोक रुढी प्रमाणें वागावें.

श्लोक याज्ञ०

पिंडदोंशहरश्चैषांपूर्वाभावेपरःपरः ६३

गौण पुत्रास कोणत्या समयीं कसा विभाग मिळावा:-

अवरस पुत्राच्या अभावीं ब्राह्मणादिक तीन वर्णांत दत्तक पुत्रा नें व शूद्रादिकां मध्यें दत्तक व पौनर्भव यांनीं आप आपल्या आई बापाची इस्टेट घेऊन श्राद्धादिक क्रिया कराव्या.

श्लोक वसिष्ठ कात्यायनौ.

उत्पन्नेत्वौरसेपुत्रेचतुर्थांशहराःसुताः॥ एक एवौरसःपुत्रःसर्वस्यवसुनःप्रभुः॥ ६४ ॥

शास्त्र प्रमाणें दत्तक घेतल्या नंतर दत्तक घेणारास जर अवरस पुत्र होईल तर घेणाराची जी स्थावर जंगम जिनगी असेल त्या पैकीं दत्तक पुत्रास चतुर्थांश देऊन बाकी सर्व धन अवरस पुत्रास द्यावें. कारण अवरस पुत्र झाल्यानें दत्तकाची मालकी कमी होते आणि त्या अवरस पुत्राची मालकी बापाचे सर्व इस्टेटीवर उत्पन्न होते. आतां विधिपूर्वक

दत्तक झाल्या कारणानें त्यास चतुर्थांश मात्र मिळावा. याहून अधिक हिस्सा अवरस असे तों पर्यंत दत्तकास मिळणार नाहीं.

श्लोक. याज्ञ०

सजातीयेष्वयंप्रोक्तस्तनयेषुमयाविधिः ६५

वरील एकंदर कलमांत पुत्रादिकांस विभाग मिळण्या विषयीं जो प्रकार सांगितला आहे तो सजातीय विवाहित स्त्रीस झालेल्या पुत्रा विषयीं मात्र जाणावा.

श्लोक. याज्ञ०

जातोपिदास्यांशूद्रेणकामतोंशहरोभवेत् ६६

१ शूद्र पासून सजातीय दासीचे ठायीं झालेला पुत्र पिता जिवंत असतां पित्याचे इच्छेनें हिस्सा घेण्यास पात्र होतो. जर लग्नाच्या बायकोचे पुत्र असून विभाग न करितां पिता मरण पावला असेल तर अवरस पुत्र यांणीं विभाग करिते वेळेस दासी पुत्रास आपल्या वांट्याचा अर्धा हिस्सा द्यावा. जर लग्नाचे बायकोचे पुत्र किंवा कन्या अगर कन्येचा मुलगा असे कोणी वारस नसतील तर पित्याची सर्व जिंदगी दासी पुत्रासच घेण्याचा अधिकार आहे.

२ मूळ श्लोकांत मुद्दाम शूद्रां पासून दासीचे ठायीं झालेल्या पुत्रास विभाग द्यावा असें सांगितल्या वरून ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यां पासून दासीच्या ठायीं झालेला पुत्र पित्याची इच्छा असेल तरीही विभागास पात्र होत नाहीं. अर्थात बाप मरण पावल्या नंतर विभाग मिळण्या विषयीं सांगणें नको. फक्त बापानें किंवा त्याचे जे वारस असतील त्यांणीं दासीपुत्रास अन्न वस्त्र मात्र द्यावें.

विज्ञानेश्वर पं०

मुख्यगौणपुत्राभावेसर्वेषांदायाद क्रमउच्यते ६७

मुख्य व गौण पुत्र याजला विभाग कसा मिळावा याज बद्दल मागें उपपादन केलें, आतां जर हे दोघे नसतील तर जिंनगीचे विभागी कोण होतील याजबद्दल विचार :—

श्लोक. याज्ञवल्क्य.

पत्नीदुहितरश्चैवपितरौभ्रातरस्तथा॥ तत्सुतागोत्रजा बंधुशिष्याःसब्रह्मचारिणः॥ येषामभावेपूर्वस्यधनभा गुत्तरोत्तरःस्वर्यातस्यह्यपुत्रस्यसर्ववर्णेष्वयंविधिः ६८

सर्वहि जातींत विभक्त निपुत्रीक मरण पावला असतां त्याच्या जिनगी चे वारीस प्रथमतः मृताची बायको, कन्या, नसेच, आई, बाप, भाऊ, पुतणे, गोत्रज, बांधव, शिष्य, व ब्रह्मचारी (एका गुरूपाशीं उपनयन व विद्याभ्या स केलेला) इत्यादिक मृताचे धनाचे पहिला नसेल तर दुसरा तो नसेल तर तिसरा असे अनुक्रमानें शेवट पर्यंत जे असतील ते वारस होता त असें समजावें.

श्लोक.मनुः

अपुत्राशयनंभर्तुःपालयंतीव्रतेस्थिता पत्न्येवदद्यात्तत्पिंडंकृत्स्नमंशंलभेतच ६९

१ निपुत्रिक मयताची पत्नी वारस होईल म्हणून वरील कलमांत सां गितलें आहे; परंतु ती जर व्यभिचारिणी किंवा वारलेली अशा रीतीची नसून पातिव्रत्यानें राहाणारी असेल तर मात्र विभक्त मयताच्या जिनगी वर तिचा वारसपणा पोंचतो व तिने नवऱ्याचें श्राद्धादिक कर्म करून जिं नगी ही घ्यावी.

उदाहरण.

१ एका पुरुषास एक किंवा त्यांहून अधिक स्त्रिया असून त्या पैकीं एक भ्रष्ट, व दुसरी व्यभिचारिणी, व तिसरी पतिव्रता अशा अनेक असतां विभक्त मयत निपुत्रीक असून त्याची जी स्थावर जंगम जिनगी असेल त्या प्रसंगीं जी बा यको नीतीनें व पातिव्रत्य धर्मानें वागणारी असेल तिणेंच आपल्या भ्रता राची सर्व जिनगी घ्यावी. भ्रष्ट व व्यभिचारिणी ज्या असतील त्यास कांहीं मिळूं नये. कारण नवऱ्याचा उद्धार नीतीनें वागणारी जी स्त्री तिज पासून होणारा आहे. म्हणोन इतरांनीं न घेतां तिणेच घ्यावें.

श्लोक.कात्या.

तदभावेतुदुहितायद्यनूढाभवेतदा. ७०

निपुत्रीक विभक्ताची स्त्री विभक्त असून तिचा नवराही मयत असेल त्या प्रसंगीं त्याच्या अविवाहित कन्या ज्या असतील त्यांणीं मयताची जिनगी

वांटून घ्यावी.

गौतम:

स्त्रीधनंदुहितॄणामप्रत्तानामप्रतिष्ठितानांच ७१

वरील कलमांत विभक्त निपुत्रीक मयत पुरुषास बायको नसून कन्या असतील तर त्यांणीं जिनगी घ्यावी ह्मणून सांगितलें आहे, त्याजवरून विवाहित कन्येस मयताची जिनगी मिळूं नये असें होतें, तर तसें न समजतां विवाहित व अविवाहित ज्या कन्या असतील त्यां॰ सर्वांनीही विभाग घ्यावा असें समजावें; परंतु त्यांत विवाहित, अविवाहित, व विवाहित सधन व निर्धन अशा अनेक प्रकारच्या असतील तर प्रथमतः अविवाहित ज्या कन्या असतील त्यांणींच सर्व धन घ्यावें. तशा नसून सर्व विवाहित असतील तर ज्या निर्धन आहेत त्यांणींच सर्व घ्यावें; जर सर्व अविवाहित व तसेच सर्व विवाहित सधन किंवा निर्धन असतील तर सर्वांनी समान वांटून घ्यावें.

श्लोक·विष्णु:

अपुत्रपौत्रसंतानेदौहित्राधनमाप्नुयु: ७२

१. विभक्त निपुत्रिक मयताची स्त्री नसेल आणि त्याची कन्या असेल तरी तिणें मृताची जिनगी घ्यावी, ह्मणून सांगितलें आहे. आतां जर मृताचे पुत्र पौत्र व कन्या इत्यादिक नसून कन्येचा पुत्र ह्मणजे सदरील निपुत्रीक मृताचा दुहित्र असेल तर त्यानेंच सर्व जिनगी वारस नात्यानें घ्यावी.

२. मृताचा पौत्र नसून प्रपौत्र ह्मणजे मुलगीचा नातू असेल तर विभक्त निपुत्रीक मृताची जिनगी वारस नात्यानें प्रपौत्रास मिळणार नाहीं. कारण वरील स्मृतिकार यांणी दौहित्रास मात्र वारस नात्यानें जिंदगी घेण्यास अधिकार आहे, असें सांगितल्या वरून इतरांस घेण्याचा अधिकार नाहीं हें स्पष्ट होतें; याज करितां त्याचे आजोस किंवा बापकोस विभक्त निपुत्रीक मयताची जिंनगी वारस नात्यानें आली असून ते मृत होतील तर मात्र त्यास मिळेल. इतर प्रसंगीं मिळणार नाहीं.

श्लोक·विष्णु:

पूर्वेषांतुस्वधाकारेपौत्रादौहित्रकामता: ७३

मातामह ह्मणजे आईचा बाप याच्या श्राद्धादिक क्रिया करण्यास

षयीं पुत्र, पौत्र व प्रपौत्र नसतील तर दौहित्र हा पुत्र पौत्र व प्रपौत्र यांच्या ठिकाणीं अधिकारी होतो, ह्मणून त्यावें वारस मान्यानें मृताची सर्व जिनगी घेऊन श्राद्धादिक क्रिया कराव्या.

पंक्ति. विज्ञानेश्वर.

तदभावेपितरौधनभाजौ ॥ मातापितरौ ॥

१. अवरस पुत्रा पासून दौहित्रा पर्यंत कोणीही वारस नसतील तर सदहूं मयताची जिनगी कोणी घ्यावी तर विभक्त निपुत्रीक मयताच्या सख्या आईनें घ्यावी कारण प्रथमतः बापाकडे जर वारसा पोचेल तर त्यास अनेक बायका असून त्यास अनेक पुत्र असतात याज करितां सर्व पुत्राचा वारसपणा बापावरु एकसारखा आहे. अर्थात बापाचे द्वारें तेही मालक होतील, याजकरितां या वचनास बाध येतो एतदर्थ बाप असतांही मयताच्या आईनेंच जिनगी घ्यावी जर आई नसेल तर पुढें बापानें घ्यावी. बापाच्या अभावीं सख्खा भाऊ, सावत्रभाऊ, पुतणे, मयताची आजी, आजा, चुलता, त्याच्या मावें चुलत भाऊ या प्रमाणें सात पिढ्यांतील जे वारस असतील त्यांणीं जिनगी घ्यावी त्याच्या अभावीं चौदा पिढ्यांतील जें समानोदक असतील त्यांणीं घ्यावी. त्याचाअभावीं १आत्म बंधू, पितृबंधू, मातृ बंधू त्याज बद्दल दत्तक प्रकरणांत सांगितलें आहे तेथे पहा—☞ आचार्य, शिष्य, ब्रह्मचारी, श्रोत्रिय, ब्राह्मण अशा अनुक्रमानें ब्राह्मण जातींत पूर्वीचे वारस नसल्यास पुढील जे जे वारस असतील त्यांणीं विभक्त निपुत्रिकाचें धन घ्यावें.

२. क्षत्रियववैश्य या जातींत कोणी विभक्त निपुत्रीक मयत होईल आणि याची पत्नी आरंभ करून सब्रह्मचारी पर्यंत कोणी वारस नसल्यास त्याचें धन राज्यानें घ्यावें.

३. शूद्रादीक इतर जातींस कोणी निपुत्रिक मृत होऊन त्याची पत्नी आरंभ करून बांधवा पर्यंत वारस कोणी नसल्यास त्या मयताचें धन सदरहू प्रमाणें राजानेंच घ्यावें.

श्लो० याज्ञ०

वानप्रस्थयतिब्रह्मचारिणांऋक्थभागिनः
क्रमेणाचार्यसच्छिष्यधर्मभ्रात्रैकतीर्थिनः ॥

१ वानप्रस्थ ह्मणजे- बहिरागी, गोसावी, [illegible]

पत्नीदुहितरश्चैवपितरौभ्रातरस्तथा ॥ तत्सुतागोत्रजेतियथैवास्तातथापुत्रः पुत्रेणदुहितासमा ॥ तस्यामात्मनितिष्ठंत्यांकथमन्योधनंहरेत् ॥ इतिकात्यायनवचनात् ॥ अनंतरः सपिंडाद्यस्तस्यधनंभवेदिति ॥ तथा ॥ यस्यासंनतरस्तेषांसोनपत्यधनंहरेत् ॥ इतिच ॥ देशजातिकुलानांचेतिकेवलंशास्त्रमाश्रित्येति ॥

पुत्र, ,चुलते, जवळचे इतर भाऊबंद इत्यादिक कोणी वारस नसून, मृतभावाची मुलगी असलां त्याचें संरक्षण कांहीं दिवस करून पुढें तो मनुष्य मयत होईल, आणि त्याची कांहीं इस्टेट, व कर्जही असेल तरी पुतणीच्या नात्यानें चुलत्याची इस्टेट घेण्याचा अधिकार तीस आहे, तसेच मृतानें कर्ज देणें असेल तर तेंही तिणें फेडावें. मयताची इस्टेट बेवारस होणार नाहीं. अशा प्रसंगीं पुतणीचा वारसा आहे.

श्लोक. स्मृतिः

मयूखादौ ॥ स्वर्यातेस्वामिनिस्त्रीतुग्रासाच्छादनभाजिनीस्यादिस्मृतिर्द्रष्टव्या ॥

अनेक अविभक्त भावा पैकीं एक भाऊ मयत झाला असून मयताच्या स्त्रीचें आणि त्याच्या भावाचें गृहकृत्यासुळे न बनल्यानें मयताची स्त्री वेगळी राहून आपले दीरापाशीं अन्न वस्त्र मागेल, आणि ती व्यभिचारिणी नसेल तर मात्र दिरानें भावजयेस अन्न वस्त्र दिलें पाहिजे. मग त्याणें मयत भावाची इस्टेट घेतली असो किंवा नसो.

येतमेवविधिंकुर्यादित्यादि ॥ कर्कशाशंकितव्यभिचाराद्यस्तंतेनिर्णयः ॥

नवऱ्या पासून निराळी राहून अन्न वस्त्र घेण्या बद्दल नवऱ्यावर फिर्याद करण्याचा स्त्रीस अधिकार नाहीं. ती व्यभिचार कर्म करणारी नसेल व घटस्फोट झाला नसेल, परंतु व्यभिचार कर्म करिते अशी शंका मात्र असेल तर तिजला नवऱ्यानें आपल्या पासून वेगळी ठेवून अन्न वस्त्र मात्र दिलें पाहिजे.

अथ
वेतनादान प्रकरण प्रारंभः

भृत्यानांवेतनस्योक्तो दानादानविधिक्रमः
वेतनस्यानपाकर्मतद्विवादपदंस्मृतम् ॥१॥

वेतनादान ह्मणजे काय याजबद्दल व्याख्या·

मजूर, चाकर, कारीगर, इत्यादिकांस चाकरी केल्या बद्दल वेतन देणें किंवा न देणें अशा व्यवहारास वेतनादान असें ह्मणावें.

करार केलेलें वेतन घेऊन किंवा न घेतां चाकरी करणें किंवा न करणें याज बद्दल —

श्लोक. याज्ञवल्क्यः

गृहीतवेतनः कर्मत्यजन्द्विगुणमावहेत् ॥
अगृहीतेसमंदाप्योभृत्यैरक्ष्यउपस्कृतः २

१. जो चाकर यजमाना पासून करार केलेलें वेतन घेऊन काम करीतना हीं, तरी घेतलेला पैसा चाकरा कडून धन्यास परत देववावा, किंवा कामाची जरूरी पाहून चाकर व कारीगर याजपासून यजमानास दुप्पटही पैसा परत देववावा.

२. कांहीं एक काम असुक दिवसांत करून देऊं असा यजमाना बरोबर मजूरदार याणें करार केला; परंतु त्याजबद्दल मजूरीचा पैसा घेतला नसोन कामही करीत असेल तर करारा प्रमाणें काम करवावें न करील तर त्या करारा प्रमाणें पैसा देण्याचा जो ठराव झाला असेल तो अमलांतही आणावा.

करार केलेलें वेतन कोण कोणते रीतीनें द्यावें याज बद्दल.

श्लोक. कात्यायनः

भृतयेवेतनंदद्यात्कर्मस्वामीयथाक्रमम् ॥
आदौमध्येवसानेवाकर्मणोयद्विनिश्चितमिति३


ज्या कामा बद्दल जो पैसा देण्याचा ठराव झाला असेल तो पैसा का माच्या आरंभीं, मध्यें अगर शेवटीं अशा अनुक्रमानें द्यावा. अगर सर्व काम केल्या नंतर किंवा अगोदर देण्याचा ठराव झाला असेल तर त्या

१. यजमानानें गांवास जाण्याचा बेत करून, शिपाई, चाकर, मजूर, इत्यादिकांस जाण्यास सांगितलें असून त्यांणी जाण्या विषयीं कबूल केलें आणि तो स्वतः जात नसोन आपल्या मोबादला दुसऱ्या सही पाठवीत नाहीं तर त्याजला जो पगार कबूल केला असेल त्याचा सवा भाग कमी करून बाकी पगार त्यास द्यावा. जर मार्गानें जात असून मध्यंतरीं काम सोडील तर पगाराचा चौथा हिस्सा कमी करावा. जर अर्ध्या मार्गांत काम टाकील तर कांहींच देऊं नये.

२. यजमान एकवार चाकर ठेऊन देशांतरास जात असतां चाकर मजूर इत्यादिकांस वाटेनें जात असतां रजा देईल तर वरील नियमा प्रमाणें यजमान याजकडून चाकर इत्यादिकांस पगार देवबावा. परंतु चाकर किंवा यजमान या उभयतां पैकीं कोणासही देह उपद्रव ह्मणजे दुखणें आलें असेल तर वरील नियम लागू नाहीं.

३. जो कोणी चाकर किंवा कारेगर, किंवा मजूर या पैकीं कोणास आजार झाला नसून आंगदांडगाईनें तो काहीं काम करीत नसेल तर त्याजला चाकरी वरून दूर करून कांहीच पैसा देऊं नये.

समाप्त.



अथ

संसृष्ट प्रकरण प्रारंभः

व्याख्या.

संसृष्ट संसृष्टींतील संसर्ग व असंसृष्ट याचा विचारः—

मयुरव पंक्ति.

विद्यमानभाविबाधनं आवयोःपुनर्विभागावधिः साधारणमित्याकारिनाबुद्धिरिच्छावासंसर्गः १

प्रथमतः संसृष्ट या पदांतील संसर्ग याचा अर्थ काय आहे तो सांगतो:—

संसृष्टी यांतील संसर्ग. ह्मणजे विद्यमान द्रव्य असेल तें व परस्परांस भावीं जें मिळणार तें द्रव्य पुनः विभाग होई तों परियंत समाईक असावें, असा उभयपक्षींस केल होऊन एकत्र राहतात त्या राहण्यास संसर्ग असें ह्मणावें.

संसृष्टी ह्मणजे काय याजबद्दल उपपादन.

श्लोक. बृहस्पतिः

विभक्तोयःपुनःपित्राभ्रात्रावैकत्रसंस्थितः॥पितृव्ये णाथवाप्रीत्यातनःसंसृष्टउच्यते॥२॥

संसृष्ट ह्मणजे प्रथमतः जे ज्याशीं विभाग होऊन पुनः तेच त्याशीं आपआपल्या संतोषानें विभक्तांशीं एकत्रमिळतात; त्या मिळणारांस संसृष्ट असें ह्मणावें.

संसृष्ट धन ह्मणजे काय?

जें संसृष्ट होणार तें जें धन घेऊन एकत्र मिळतात तें धन व एकत्र मिळाल्या नंतर जें धन मिळतें तें धन अशा दोनी धनास संसृष्ट धन असें ह्मणतात.

कोण कोणाशीं कोण कोणत्या रीतीनें विभाग व्हावा याजबद्दल दायविभाग प्रकरणांत सांगितलें आहे, ह्मणोन या प्रसंगीं विस्तार केला नाहीं.

कोण कोणाशीं विभक्त होऊन पुनः कोण कोणाशीं मिळाले असतां संसृष्ट हो तात ते सांगतो.

प्रथमतः आई, बाप, चुलता, भाऊ, पुत्र, नातु, बायको, पुतणे, इत्यादिक परस्परांवि भक्त होऊन पुनरपि तेच एकत्र मिळाले असतां ते संसृष्ट होतात असें समजावें.

असंसृष्टह्मणजेकायवतेकिती प्रकारचे आहेत यांचें उपपादन

वर लिहिलेले आई बाप भाऊ इत्यादिक एकमेकांशीं विभक्त झाल्या नंतर तेच पुनः एकमेकाशीं मिळतील तर संसृष्ट होतात ह्मणोन सांगितलें आहे. त्या विभक्त झाल्या पैकीं एकाद्याचा पुत्र किंवा पौत्र व प्रपौत्र विभक्त झाल्याशीं मि

रून जें धन जो संपादन करील त्या धनासहवर्तमान वडिलोपार्जित धना पैकीं दोन अंश संपादन करणारास जाऊन बाकीचें धन सर्वत्रांनीं समान वांटून घ्यावें, असें आहे; आतां या प्रसंगीं जरी संसृष्टी संसृष्ट धनाचा खर्च करून विद्या शौर्यादिकानें धन संपादन करील तरीही दोन अंश संपादकास देऊन बाकीध न समान वांटून घ्यावें.

श्लोक. याज्ञव०

सोदरस्यतुसोदरः ॥६॥

संसृष्टी भावाचें धन कोणी घ्यावें याजबद्दल.

संसृष्टीचें धन कोणी घ्यावें याजबद्दल मागील कलमांत सांगितलेंच आहे. आतां या प्रसंगीं सहोदर संसृष्टी पैकीं एक निपुत्रिक संसृष्टी मरण पावेल तर अवशिष्ट जो सहोदर संसृष्टी राहिला असेल त्याणें मृताचें सर्व धन घ्यावें.

तिघे भाऊ सख्खे असून त्या पैकीं दोघे संसृष्ट आणि एक असंसृष्ट असे असतील तर जे संसृष्ट झाले त्या पैकीं जर एक निपुत्रीक मरण पावेल तर त्याचें धन जो असंसृष्ट सहोदर राहिला असेल त्यास न मिळतां संसृष्ट जे सहोदर असतील त्यांणींच घ्यावें.

शंका घेऊन निवारण– असंसृष्ट सख्ख्या बंधूस निपुत्रीक मृत संसृष्टीचें धन कां मिळूं नये? तर त्याचें कारण इतकेंच आहे कीं, विभक्त झाल्या नंतर सहोदरा पैकीं जितके संसृष्ट झाले असतील तितक्यांसच द्रव्याचा विभाग मिळावा. कारण संसृष्ट व सहोदर अशीं दोन कारणें त्यांस आहेत. व असंसृष्ट सहोदरास संसृष्ट होणें हें कारण कमी आहे, अर्थात त्यास हिस्सा मिळूं नये.

श्लोक. कात्याय०

अन्योदर्यस्तुसंसृष्टीनान्योदर्योधनंहरेत ॥ असंसृ

ष्टापिवाददयात्संसृष्टोनान्यमातृजः ॥७॥ ७ ॥

संसृष्ट सावत्र भाव्याचें धन कोणी घ्यावें याजबद्दल.–

कांहीं सहोदर व कांहीं भिन्नोदर असे उभयतां विभक्त झाल्यानंतर पुनः संसृष्ट होतील नंतर कांहीं दिवसानीं पुनः विभागाची संधी येईल तर परस्परांचे धनाचा विभाग सम व्हावा.

दोघे सहोदर असून त्या पैकीं एक सहोदर व एक भिन्नोदर असे उभयतां संसृष्ट होऊन पुढें कांहीं दिवसांनीं संसृष्ट झालेला निपुत्रिक [illegible]

त होईल तर त्यांचें धन भिन्नोदर संसृष्टी व सहोदर असंसृष्टी या उभय तांनीं समान वांटून घ्यावें.

दोघे सहोदर आणि एक भिन्नोदर असे त्रिवर्ग असून विभक्त झाल्या नंतर दोघे सहोदर संसृष्ट होतील आणि भिन्नोदर असंसृष्ट असून त्या सहो दर संसृष्टी पैकीं एक निपुत्रिक संसृष्ट मरण पावेल, तर त्याचें धन सहो दर संसृष्टीनेंच घ्यावें. असंसृष्ट भिन्नोदरास कांहीं मिळणार नाहीं.

सहोदर असंसृष्ट असून त्यास निपुत्रीक मृत संसृष्ट सहोदराच्या जिन गींतून विभाग मिळावा व असंसृष्ट भिन्नोदर असल्यास त्यास मृत संसृ ष्टीचे जिनगींतून विभाग मिळूं नये, ह्मणोन वरील रकमेंत सांगितलें आहे, तर त्यांत इतकाच भेद आहे कीं, संसृष्ट झाल्यानें त्या भिन्नोदरास मालकी येते व असंसृष्ट सहोदरास एकोदराचा संबंध असल्या मुळें मालकी स्वयमेव आहे सबब असंसृष्ट भिन्नोदरास मृताचे जिनगीचा हिस्सा मिळावा हें योग्य आ हे. आतां मृत संसृष्टीचे पुत्र पौत्र व प्रपौत्र असे असतील तर मृताच्या स र्व धनावर मालकी त्यांचीच आहे, दुसरे कोणाची नाहीं; परंतु क्रमानें ह्मण जे पुत्रा नंतर पौत्र व प्रपौत्र यांणीं घ्यावें.

श्लोक. नारदः

भरणंचास्यकुर्वीरन्स्त्रीणामाजीवनक्षयात् ८

मृतसंसृष्टाची बायको असेल तर तिजला मृतसंसृष्ट भर्ताचा विभाग न मिळतां फक्त अन्नवस्त्र मात्र मृताचें धन ज्याच्या ताब्यांत येईल त्याजकडू न मिळेल; परंतु संसृष्ट झाल्या नंतर पुन्हा विभक्त होऊन तिचा नवरानि पुत्रीक मरण पावेल तर त्याच्या धनाची मालकी त्या स्त्री कडेस होईल, तसे च भ्रतार आणि स्त्री संसृष्ट झाले असून भ्रतार मरण पावेल आणि त्या स पुत्रपौत्रादिक संतती नसेल तर त्या धनावर त्या स्त्रीचीच पूर्ण मालकी होईल.

श्लोक. शंखनारदः

यातस्यदुहितास्तस्याःपित्र्यंशाद्भरणंमतम्
आसंस्काराद्भरेद्भागंपरतोबिभृयात्पतिः ९

मृत संसृष्टीची कन्या असेल तर मृताचें धन ज्याचे ताब्यांत येईल त्याणें त्या धनांतून त्या मृताच्या कन्येचा विवाह होई तों परियंत तिचें संरक्षण

श्लोक. प्रजापतिः

अंतर्धनंतुयद्द्रव्यंसंसृष्टानांतुयद्भवेत् १६

मृत संसृष्टीचें जंगम धन गुप्त असोन तो मृत झाला असेल आणि त्याचा मागें भिन्नोदर संसृष्ट एकटाच राहिला असेल तर तो मृत संसृष्टीचे धनाचा एकटाच मालक होईल, या प्रसंगीं असंसृष्ट होणार नाहींत.

श्लोक. प्रजापतिः

भूमिंगृहंलसंसृष्टाः प्रगृण्हीयुर्यथांशतः १७

सहोदर असंसृष्ट व भिन्नोदर संसृष्ट असे असून त्या प्रसंगीं मृत संसृष्टीचें गुप्त स्थावर धन असेल तर सहोदर असंसृष्ट व भिन्नोदर संसृष्ट-यांणीं समान वांटून घ्यावें. जर जंगम धन गुप्त असेल तर मात्र असंसृष्ट सहोदरास विभाग न देतां भिन्नोदर संसृष्टी यांणींच सर्व घ्यावें. जर तिघे सहोदर व एक भिन्नोदर पैकीं दोघे सहोदर व एक भिन्नोदर असे तिर्घे संसृष्टी होऊन एक सहोदर असंसृष्ट असतां सहोदर मृत संसृष्टीची स्थावर मिळकत गुप्त असेल तर ती सहोदर व भिन्नोदर संसृष्टी यांणीं वांटून घ्यावी. सहोदर असंसृष्टास मृत संसृष्टीचा हिस्सा मिळूं नये.

दोघे सहोदर आणि एक भिन्नोदर असे तिघे विभक्त होऊन त्या पैकीं दोघे सहोदर परस्परांशीं संसृष्ट होऊन भिन्नोदर असंसृष्ट असोन कांहीं दिवसांनीं संसृष्ट सहोदरा पैकीं एक मृत होईल, आणि त्याचें गुप्त स्थावर धन असेल तर सहोदर संसृष्टी यांणेंच घ्यावें. असंसृष्ट भिन्नोदरास संसृष्ट झाल्या वांचून मयताचा हिस्सा मिळणार नाहीं.

शंखनारदस्मृति.

भ्रातृणामप्रजाः प्रेयात्कश्चिच्चेत्प्रव्रजेतवा.
विभजेरंधनंतस्यशेषास्तेस्त्रीधनंविना ॥ १८

अनेक पुत्रां पैकीं एक निपुत्रीक, व आई, बाप, भाऊ, चुलता असे परस्पर संसृष्ट होऊन त्या पैकीं निपुत्रीक संसृष्ट पुत्र मृत होईल, किंवा चतुर्थाश्रम घेईल त्या प्रसंगीं निपुत्रीक पुत्राचें संसृष्ट धन त्याचें श्राद्ध सुरक्षितें करून प्रथमतः आईनें घ्यावें, आई नसल्यास तिच्या अभावीं बापानें घ्यावें. तो नसल्यास बाकी जे भाऊ असतील त्यांणीं दाय विभागांतील अनुक्रमानुसार सारखें वांटून घ्यावें. परंतु जर मृताचे सहोदर बंधू असंसृष्ट असतील तथापि त्यां-

आई बापाचे पश्चात चुलते इत्यादिकां बरोबर स्त्रीधना वांचून समान विभाग मिळेल.

(२) वरील रकमेंत प्रथमतः संसृष्टीनें धन घेण्याचा अधिकार आईस दिला आहे; परंतु, तिजला तें धन घेण्याच्या वारशा मुळें मात्र संबंध आहे, परंतु त्याचा बाप नवरा आहे तों पर्यंत त्याच्या अनुमती वांचून करण्याचा अधिकार तिजला नाहीं. तसेच पुत्र, पौत्र, प्रपौत्र जर असतील तर त्या धनावर त्यांचीच मालकी पूर्ण आहे

श्लोक. नारदः

रक्षंतिशय्यांभर्तुश्चेदाच्छिंद्युरितरासुच॥ भरणं चास्यकुर्वीरन्स्त्रीणामाजीवनक्षयात्॥ १९॥

प्रथमतः दोघे सहोदर हे विभक्त होऊन नंतर त्या पैकीं एका सहोदराची बायको नवऱ्याशीं विभक्त होऊन, पुढें कांहीं दिवसांनीं आपले विभक्त स्त्रीसह वर्तमान बंधूशीं संसृष्ट होऊन नंतर कांहीं दिवसांनीं तो मृत होईल तर त्याच्या पत्नीस विभाग न मिळतां तिचें स्त्रीधन जें असेल तें तिचे जवळ असोन तें वारसांनीं न घेतां तिच्या नवऱ्याच्या हिंश्शा पैकीं, फक्त अन्न वस्त्र देऊन रक्षण करावें. परंतु ती स्त्री व्यभिचारि व निंद्य कर्म करणारी असें असेल तर अन्नवस्त्रसुद्धां देऊंनये.

श्लोक. बृहस्पतिः॥ यातस्यभगिनीसातुततोंशंलब्धुमर्हति॥ अनपत्यस्यधर्मोयंअभार्यपितृकस्यच॥ २०॥

मृत संसृष्टीची बायको व आई आणि बाप व कन्या व पुत्र या पैकीं कोणीच नसून त्यास एक किंवा एकाहून अधिक बहिणी असतील तर मृताचे धनातून कांहीं अंश त्या बहिणीस देऊन बाकीचें धन वारसाच्या अनुक्रमानें दायविभागा प्रमाणें वांटून घ्यावें.

ग्रंथकार. उदाहरण  पहा क्र. १७ -

सहोदर असंसृष्ट असोनही संसृष्टी भिन्नोदराचा विभागी होतो, आणि भिन्नोदर असंसृष्ट असेल तर सहोदर संसृष्टीचा विभागी होत नाहीं याचें कारण इतकेंच आहे कीं भिन्नोदरा पेक्षां सहोदराचें महत्व सहोदरनात्यानें विशेष आहे सबब हिस्सा मिळणें हें योग्य आहे. आतां भिन्नोदर संसृष्ट होईल तरच असंसृष्ट सहोदराचे बरोबर त्याची योग्यता येणारी आहे. आतां या प्रसंगीं तोसुद्धां भिन्नोदर त्यांतून असंसृष्ट अशा दोनीं अंशानें कमी आहे म्हणोन त्याला हिस्सा न मिळावा हें योग्य आहे

अन्न वस्त्र व हिस्सा न मिळण्या बद्दल.

पतित, ह्मणजे धर्मांतून भ्रष्ट झालेला, तज्ज ह्मणजे पतिता वस्थेंत झालेला मुलगा व सन्यासी, व सन्यास धर्मांतून भ्रष्ट झाल्या नंतर त्यास झालेला मुलगा अशा चौघांस वर सांगितल्या प्रमाणें अन्नाच्छादन व विभाग या पैकीं कांहींच मिळणार नाहीं.

वरील १२वे कलमांत लिहिलेलीं मनुष्यें सोडून बाकी जीं मनुष्यें वर सांगितलीं आहेत त्या सर्वांस ज्याचे ताब्यांत वडिलो पार्जित, किंवा स्वतः मिळविलेलें द्रव्य असेल त्यानीं त्या धनांतून अन्नवस्त्र मात्र द्यावें.

मयूखपंक्ति.

व्यभिचारेबहिर्निष्क्रासनमपोषणंच. १३

अनंशाची व्यभिचारिणी स्त्री असल्यास तिजला अन्नाच्छादन व दाय विभागांत सांगितल्या प्रमाणें हिस्सा व स्त्रीधन या पैकीं कांहींच न देतां तिजला घराबाहेर घालवून द्यावें.

श्लोक. याज्ञव.

औरसास्तेषांनिर्दोषाभागहारिणः १४

विशेष नेम.

पतित झालेल्याचा मुलगा भ्रष्ट होण्याचे पूर्वी झालेला असेल तर त्यास दाय विभागांत सांगितल्या प्रमाणें विभाग मिळेल.

श्लोक. याज्ञ.

सुताश्चैषांप्रभर्तव्याः यावद्वै भर्तृसंस्कृताः

पतीत होण्या पूर्वीच्या मुली असतील तर त्या मुलीचें लग्न होई पर्यंत रक्षण करून बापाचे हिशांतून मुलीचे लग्ना बद्दलही खर्च करावा.

श्लोक. याज्ञ.

अपुत्रायोषितश्चैषांभर्तव्याःसाधुवृत्तयः

पतीताची बायको व्यभिचारिणी नसोन नीतीनें वागणारी असेल तर तीस अन्नाच्छादन देऊन रक्षण करावें.

कायद्याप्रकरणीं.

बहिष्कृत झालेल्या बद्दल कायद्या वरून विरुद्ध नियम, भ्रष्ट झालेल्यास हिस्सा मिळण्या बद्दल शास्त्रानें मनाई केली आहे; परंतु कायद्याने

त्याजला विभाग मिळण्या विषयीं मुक्तता केली; हें समजण्या करितां त्या कायद्याचा उतारा खालीं घेतला आहे.

सन १८५० चा कायदा २१

कलम १.

ईस्ट इंडिया कंपनीचे अमेला खालचे देशा मध्यें कोणी पुरुष किंवा स्त्री एक धर्म सोडून दुसरे धर्मांत जाते, अथवा कोणतेही धर्माचे लोकांनीं त्यास किंवा तीस धर्मांतून बहिष्कृत केलें, किंवा जातिबाहेर टाकिलें असें असतांही जें सध्यां चालू शास्त्र किंवा साधारण रीत याचे योगानें त्याचे हक्क किंवा मिळकती नाहिशा होतात; किंवा वारसपणाचा कोणताही हक्क कमी होतो, किंवा बुडतो, असा जो कोणताही शास्त्रांतील ठराव अथवा साधारण रीत ही ईस्ट इंडिया कंपनीचे कोर्ट व बादशाही सनदेने स्थापलेलीं सदरहू कोर्टें या मध्यें कायदा प्रमाणें अमलांत आणूं नये.

समाप्त.



पत्र करून दिलें असेल तर तें देणें अशास्त्र होऊन परत होईल असें समजावें.

समाप्त.

शुद्धिपत्र.

अशुद्ध.	शुद्ध.	श्लोक.
स्त्रीधन.		
या	प	२
य	ध्य	२
क्षैः	क्षेः	९
क्षा	स्या	११
चेद	चद्दे	१३
द	द्द्	१९
र्ता	र्त्ता	२०
कंम्	कम्	२२
रंदा	रन्दा	२३
जा	ज्ञ	२९
त	हेंअक्षरलको.	३४
संसृष्टी.		
धिः	धि	१
यौ	यौं	७
चा	चा	७
ये	य्ये	१५
ऋणादान.		
ई	रं	१३
स्त्री	स्त्रि	१४
श	ना	१५
वि	नि	१७
क्षु	षू	१८
स्त्री	स्त्रि	२२
स्त्री	स्त्रि	२४
श्य	श्यं	३२
त	त्त	३६
र्थ	र्थे	३७
दत्तक.		
त्र	द्रे	१
सं	स	२
म	स्म	५
वः	व	५
णा	ण	७
हु	हू	१०
वां	ना	१०
यं	पं	११
णा	ण	१५
स्य	स्यरं	१६
हु	हो	१८
त्या	त्सा	१८
णा	णां	१९ कं.५.
सेते	साते	२१
दत्त	रदत्त	२३
सा	सादि	२४
न	र्न	२४
रु	रू	२५
दायभाग.		
सं	स्तं	७
र्मे	र्म	११
स्य	प	११
श्रं	श्रे	११
क्षः	क्षं	११
स	म	१२
लं	ल	१२
वं	ब	१२
णापा	णास्या	१३
व्य	व्ये	१३
द	द्र	१७
त्त	त्तु	१७
स	स्य	१९
ड	डं	२०
द्वि	द्वि	२३
पुं	सुं	२५
नं	नां	२७
स्त्र	स्त्रं	३०
द्वि	द्व	६२
स	ध	८९
लु	त्तु	९७
सो	सा	२
त्रः	त्र	९
द्धः	द्धं	११
क्रि.	क्रि.	२१

निवाडा नंबर. २१९

बा. क. द. म. भा. १५

